**३१ डिसेंबर २०२१.**

इरावतीचे मन:पूर्वक अभिनंदन ! मला जरा अधिकच आनंद कारण ही तर माझ्या ' इराक ' या नाटकातली अभिनेत्री आणि त्या नाटकाची चेतन दातार बरोबरची सहदिग्दर्शिका !

मन फ्री सोडल्याशिवाय एवढा आवाका शक्य नाही ! मराठी कवितेत हे वेगळेच काही घडत आहे ! ( राहुल पुंगलिया यांची कविता ).

प्रयोग परिवार, नाशिक यांचा हा प्रयोग मराठीतल्या एकूणच निवडक प्रयोगांपैकी एक होता ! नंतर पुन्हा एकदा हा प्रयोग अतुलनेच दिग्दर्शित केला होता ! ज्यांनी हे प्रयोग बघितले ते भाग्यवान ! ( वेटिंग फॉर गोदो )

खूप शुभेच्छा ! पारधी सरांनी माझ्या ' धागेदोरे ' या नाटकावर खूप चांगले परीक्षण लिहिले होते !

राजन अपरंपार -- " याच्या उलट समजा भक्तिमार्गी वा आस्तिक असतात. पण अशा या दोन प्रकारांत – त्यांच्या जगण्यात मूलभूत असा काही फरक असतो का ? दोन्ही प्रकारची माणसे दु:ख भोगणारी, महत्त्वाकांक्षी, भीतिग्रस्त, वर्चस्ववादी, हिंसक, प्रेमळ, क्रूर, युद्धखोर, वगैरे असलेली दिसतात. दोन्ही प्रकारांत अलगता आणि अस्मिता यांचा प्रभाव दिसतो. " -- हे लिहिले आहेच ना ! आणि इहवाद म्हणजे विदीर्णता असेल तर तेच मूल्य समजायचे का ? आणि जे असेल ते सगळे इहवादच असेल तर इहवाद असे वेगळे म्हणावे का लागते ? हजारो मूल्ये असणारच, असे समर्थन केले तर मग ते जाते एका निराशावादाकडे. मग कलेला सर्जक वा श्रेयस्कर म्हणायचेही कारण राहणार नाही. सगळे हिंसक आणि विनाशकच असणार, असा त्याचा अर्थ होतो. पण, तुम्ही म्हणत आहात तसे खरेच लिहा यावर सविस्तर, ही विनंती.
खरे तर यावर या पोस्टमध्ये लिहिलेले आहे. प्रभावयुक्तता आणि परिस्थितिसापेक्षता हेच फक्त सत्य असे मानणाऱ्या कुणाचाही मूल्याशी संबंध असू शकत नाही -- अशी ही स्पष्ट मांडणी आहे.
नुसते फेसबुकवर नीट पाहिलेस तरी अशी माणसे दिसतील -- बुद्धी ही प्रभावयुक्त आणि परिस्थितिसापेक्ष असल्याने तिचा वापर वेगवेगळा होतो -- त्यामुळे, प्रत्येकाची मूल्यात्मता वेगळी असते, असले भोंगळ बोलावे लागते ! आणि हा वेगळेपणा हाच निष्कर्ष असेल तर मूल्य हा शब्द रद्दच होईल !

छोड दो फिर ! याहून स्पष्ट काय लिहिणार ? हे अनेकांना समजतेय -- काहींना आवडतेय, काही रागही व्यक्त करतआहेत -- म्हणजे मराठी योग्य आहे. तुमचा काय आहे प्रॉब्लेम तो तुम्हालाच सापडू शकेल !

कविता वा कला मूल्यात्म असते -- हे वाक्य बहुधा इहवादालाही मान्य असावे. तर काय असते ही इहवादी मूल्यात्मता -- हे एखाद्या इहवाद्याने थोडक्यात सांगावे. म्हणजे ही चर्चा खूप मूल्यात्म होऊ शकेल.

इतके सखोल, इतके उत्तुंग असे हे मराठीतले अपवादात्मक चिंतन आपल्या एकूणच कलाक्षेत्राला वर्षानुवर्षे प्रकाश देत राहील ! ( रवी लाखे )

ते काम नसतेच -- तो आकलनाचा सहज प्रवाह असतो -- पण सगळे वैचारिकच असते असे गृहीत धरायचे झाले तर मी म्हणेन की जगातल्या सगळ्या कविता बाद असतात ! या निमित्ताने तुम्हाला एक विनंती आहे -- कोणतेही काम लावून न दिलेली, जबाबदारी नसलेली, न भांबावलेली, न सैरभर झालेली -- अशी तुमची जी आदर्श कवितेची

कल्पना आहे, तशा कवितेची दोनचार उदाहरणे द्या ना -- अन्यथा, नुसतेच तुम्हाला माझ्या कवितांना बाद म्हणायचे आहे, एवढेच त्यातून दिसते !म्हणूनच केलीय ना विनंती -- कारण तुमच्यासमोर काही ' आदर्श ' कविता असणार, हे उघड दिसते आहे. आणि माझी पूर्ण पोस्ट नीट वाचलीत तर त्यात काम नाही. विचार, उद्दिष्ट, दिशा, अमुक एक साधणे, असे काही नाही. त्यामुळे, तुम्हाला खटकणे हे मला खटकले !

होय, पाचोरा तालुका.बालपण नाही -- १९८० ते ८४ -- नोकरीनिमित्त -- मी तिथे आमच्या बँकेच्या शाखेचा मॅनेजर होतो. होय, तेच लोहारा. कळमसरा जवळचे. त्या शाखेच्या उद्घाटनासाठी मी ना. धों. महानोरांना बोलावले होते.

सतत कुठेतरी पोचण्यात दुःख असते, हे दिसल्यामुळे. आणि तो मानसिक भिकारडेपणा न ठेवताही आपल्या कुवतीने जगता येते, हे दिसल्याने.

मला मानधनाची अपेक्षा नाही. या महिना अखेर माझ्या नातीचे लग्न आहे. जानेवारीत तू म्हणशील तेव्हा चालेल. गिरीश आणि निसर्ग यांना विचारून ठेव.

सध्या मला गंभीरपणे सुचलेली चार नावे अशी -- सतीश तांबे, राजन खान, प्रज्ञा दया पवार आणि प्रिया जामकर. आणखीही सुचू शकतील, पण, विचार तर सुरू होऊ द्या.

स्नेहाचा स्वीकार पण मी आता अटीशर्तींत बसणार नाही -- पंच्याहत्तरी ओलांडलीय !

०४ डिसेंबर २०२१.

पुस्तकांची नुसती नावे कळून किंवा त्यांची मुखपृष्ठे पाहून कितपत जाहिरात होत असेल याबाबत मला शंका आहे. एखादा आवडता लेखक असेल तर त्याचे नवे पुस्तक आलेले कळणे फार तर घडत असेल. त्या त्या पुस्तकाच्या आशयाबद्दल अभ्यासपूर्वक कुणी बोलणे, लिहिणे नक्कीच महत्त्वाचे ठरेल. पण समीक्षक ही जमातच खतम होत चाललेली आहे. याचे मुख्य कारण एकूण समाजच सर्जक कलेबाबत उदासीन झालेला आहे. लेखकांनी प्रमोशन करून यात कितपत फरक पडेल ? पण काळ बदलला आहे, अशा गोड कल्पनेत लेखक ( नाइलाजाने ) करत राहतात हे !
समस्या ही दिसते की पुस्तक म्हणजे काही शेव्हिंग क्रीम नाही -- तुम्ही काय विकू इच्छिता हे सांगणार कसे ? पुस्तक ही काही एखादी व्यावहारिक गरज भागवणारी बाब नाही. उदाहरणार्थ समजा, लाख्यांचा ' रीलया ' हा कथासंग्रह घेऊ. म्हणजे काय आहे हे ? आपण काय घेतोय विकत हे घेणाऱ्याला कळणार कसे ? मग पुढचा टप्पा म्हणजे लेखकानेच त्याच्या पुस्तकाचे राईटअप प्रसिद्ध करणे. त्याच्या पुढे म्हणजे ही कविता कशी वाचावी याचे एक मॅन्यूअलही देणे.

सतीश माझाही मित्र आहे -- तो भेटेल तेव्हा त्याला माझा नमस्कार सांगावा ! ( सतीश पाध्ये, कोल्हापूर )

मल्लखांबही गुंतागुंतीचाच तर आहे !अ विषारी आणि ब अमृतमय अशा भाबडेपणाने मी कोणत्याही दोन माणसांकडे पाहू शकत नाही -- त्यामुळेच ही पोस्ट एक साधा विनोद आहे --माणसाचे मन, त्याच्या धार्मिक वा विचारसरणीच्या अस्मिता, त्याच्या मतांचा कट्टरपणा हा विषारीच असतो -- तो घातक, हिंसकच असतो. यांची कट्टरता नरक आणि

त्यांची कट्टरता स्वर्ग, असे असूच नाही शकत. याउपर माणसाच्या जगण्याकडे कसे पाहायचे, ही तुमची निवड आहे. धर्मवादी, जातवादी वा कम्युनिस्ट यांच्या विषारीपणात कोणताही मूल्यात्मक फरक नसतो.

विशेष म्हणजे यंदा मला आले आहे आवतण !

मी एकूण २३ घरे बदलली !

याच विषयावर ' सामना ' मध्ये माझी एक मुलाखत आली होती ! होय -- कधी कधी असेही वाटे की आपण आहोत तेच तसेच आहोत -- आपल्या भोवतीच्या भिंती बदलताहेत नुसत्या ! एकदा एक घर, एक गाव सोडले की पुन्हा त्यात गुंतून राहायचे नाही -- हेही घडले ! पण हे नुसते परिणामस्वरूप होते, असे नाही म्हणता येणार !

पिरांदेल्लो , आयनेस्को , बेकेट , काफका, पेसोआ -- असे सगळे लोक हवापाण्याचे बोलत होते किंवा राजकारण करत होते, असे मी तरी नाही म्हणणार. ज्यांना तसे वाटते त्यांच्याशी चर्चा करण्याची कुवत माझ्यात नाही याची मला जाणीव आहे. ते स्वत: त्यांच्या लेखनाबद्दल जे बोललेले आहेत, ते मी खोटे समजत नाही.
सध्याचा ट्रेंड तर साहित्य म्हणजे फक्त राजकारण -- असाच दिसतो आहे !जो राजकीय भूमिका व्यक्त करण्यासाठी लिहितो तोच फक्त ! ही मराठी साहित्यात रुजवली गेलेली कल्पना साहित्याचा गळा घोटणारी आहे -- जगात सर्व माणसांना प्रस्तुत ठरणारे साहित्य हे तत्त्वज्ञानाच्या वा बुद्धाला महत्त्वाच्या वाटलेल्या प्रश्नांचे चिंतन असते. अनेक महत्त्वाचे लेखक-कवी यावर बोललेले आहेत, पण, आपण त्याकडे दुर्लक्ष करून आपले ते रेटायचे ठरवलेले आहे. तुम्ही स्वत: सध्या बोधी तर्फे तत्त्वज्ञानी लेखकांचा शोध घेत आहात -- राजकीय भूमिकावाले असे शोधावे नाही लागणार ! असे म्हणणारेही काही आहेत -- याहून वेगळे बोलणारे नामवंतही बरेच आहेत -- मराठीत राजकारण हेच सर्वस्व होऊन बसलेले आहे ! म्हणूनच ' संपादन ' म्हणजे ' भूखंड संपादन ' !प्रत्येकाचा मानसिक समय वेगळा असतो, प्रत्येकाचे वास्तव वेगळे असते -- या सत्यासह त्याचा विचार करावा लागेल -- समय म्हणजे राजकारण हे फारच निरर्थक होईल. साहित्य संमेलनाचे चार अध्यक्ष साहित्याचे अवाक्षर न बोलता फक्त राजकारण बोलून गेले ! ते बोलणेही असे की तशा विचारांचा कोणताही साधा कार्यकर्ता बोलू शकेल. साहित्य म्हणजे राजकीय विचारसरणी असे बिंबवून घेतल्यामुळे साहित्य समावेशकतेने वाचायचे इंद्रियच गळून गेलेले आहे !

सत्योत्तर काळातले सत्य !

त्यांनी, तात्पुरती का असे ना, साहित्याकडे पाठ फिरवलेली असेल तर नक्कीच ते साहित्य संमेलनाला चाललेत, असे समजावे ! 😀

real time and poetic time --यांतला फरक ! आणि त्याला मजल दर मजल करत चालत जावे लागणार ना !

विश्वामित्राचे प्रयत्नही फेल गेले ! जहाल तपस्वी असून !

हे तर बुद्धिप्रामाण्यवादाच्या बाहेरचीही व्यवस्था पाहणे आणि ती बदलण्याचा कार्यक्रम हाती घेणे ! 😀
( मोहन देस यांच्या कवितेवर ).

१६ नोव्हेंबर २०२१.

अरे वा ! अभिनंदन ! अंतिमला गेलेल्या सर्वांचेच अभिनंदन ! ( बुद्धिबळ आणि झब्बू )

मी कोल्हापुरात असताना अनिल माझाही मित्र होता. आमच्या ग्रुपमध्ये तो सर्वांत कमी बोलणारा माणूस होता.

साहित्यिक, कलात्मक समृद्धीचे प्रेम सगळीकडेच ओसंडून वाहात असल्याने, आणखी एक मुद्दा -- साहित्य संमेलनाच्या अध्यक्षाने त्याच्या भाषणात साहित्याबद्दलही काही बोलावे -- नुसत्याच राजकीय गप्पा हाणून निघून जाऊ नये. चार अध्यक्ष राजकीय भाषणे करून निघून गेले म्हणून हा मुद्दा दिला आहे --
तसे तर नरसिंह रावांनी आपल्या अध्यक्षापेक्षा भारी भाषण केले होते. परभाषेतल्या कुणाही चांगल्या लेखक, कवीला बोलवावे -- जरूर ! त्याचेही भाषण साहित्य, कला यांना योग्य ते महत्त्व देणारे असावे म्हणजे झाले !

असले मतभेद मी नाही बाळगत -- राजकीय मारामाऱ्यांचे महत्त्व वाटणाऱ्यांनी ते पाहून घ्यावे --ते ठीक -- पण, साहित्य संमेलनात अध्यक्षाने साहित्याबद्दल बोलावे, हेही एक ' मत ' ठरावे, हे दुर्दैव आहे ! तसे तर, राजकीय भूमिका घेत नाही तो साहित्यिकच नाही, अशी सदोदित साहित्यिकांना अक्कल शिकवणारेही काही कमी नाहीत ! तेही खूपच वाईट आहे, हेही माझे एक मत घ्या ! आणि माझे वाक्य नीट बघा -- अमुक बोलू नये असे मी म्हटलेले नाही -- ' साहित्याबद्दलही काही बोलावे ' असे म्हटलेले आहे -- असो -- मुळात साहित्य संमेलन ही एक साहित्याशी फारच कमी संबंध असलेली गोष्ट आहे -- एवढी मते आणि मतभेद खूप झाले ! धन्यवाद !

कुणाच्याही तुच्छतेला किंमत देऊ नये. फेसबुक हे माध्यम वापरत खूप जणांनी खूप लिहावे, असेच मला वाटते.

स्वत:चा स्वभाव, विचार -- अशा प्रकारे अलग पडत जाणे, हीच परात्मता.

बरोबर भूमिका-चूक भूमिका, पूर्ण विचार-अर्धवट विचार, कुणात ना कुणात खंत निर्माण करणारे विचार- कधीच कुणातही खंत निर्माण न करणारे विचार -- या असल्या द्वंद्वांना कितपत असतो अर्थ ? कशावर आधारित ? तुम्ही नुसतेच कुत्सित बोलताय, उत्तर काही नाहीय तुमच्याकडे, हे पाहून मला खंत वाटतेय ! ' मीच एक शहाणा ' हे प्रमेय सोडणे अनेकांना अशक्य असते, हेच खरे
येऊ द्या सविस्तर --
गंभीरपणे संवादासाठीच दिली आहे ही पोस्ट -- तो जरूर होऊ द्या. भूमिका वेगवेगळ्या का असतात, ते आधी पाहायला हवे. तेच तपशील निवडणे, त्याच तपशीलांना एकसारखेच महत्त्व देणे आणि तर्काचा वापर एकसारखाच म्हणजे ' आदर्श ' करणे -- असे होत नाही -- त्यामुळे निष्कर्ष वेगवेगळे असतात ! अशा चर्चा नेहमी ' माझेच योग्य -- बरोबर ' यावर संपतात ! टीव्हीवरच्या चर्चा तुम्ही पाहात असालच. याने आणलेली रद्दी वेगळी असते आणि त्याने आणलेली वेगळी असते ! सिद्ध काहीच होत नाही -- नुसती आपापली मते मांडणे घडू शकते. खरे तर तेवढेच घडू शकते -- भुंकण्या-बोचकारण्याचा काहीच उपयोग नसतो. हे समजून चर्चा झाल्या तरच त्यांना ' सहिष्णू ' चर्चा म्हणता येईल. अन्यथा सगळे निरर्थक आणि निरुपयोगीच ठरणार.

आदर्श अशा गोड गोडव्याचा तराजू क्षणात ठिकाणावर आणून समतोल करणारी वजनदार रचना ! ( गजू तायडे )

इथे काहीही म्हणणे धोक्याचे आहे -- एक ललित मजकूर म्हणू या ! ( ‘ चिमणी ‘ या कवितेबद्दल )

विचाराच्या परिघात बंदिस्त असणाऱ्या ' अर्थयुक्त शब्दांची ' विदारक कविता ! हा विषय कवितेत येणे हीच एक क्रांती आहे ! ( राहुल पुंगलिया )

पूर्वग्रह सोडून वाचता यावी कविता -- अन्यथा ज्यालात्याला कळलेले ज्याच्यात्याच्या जवळ आहेच -- कविता वाचायची गरजच नाही --व्यक्तिवाद आणि समूहावाद या द्वंद्वाच्या चाकोरीत अडकलेल्या रोगट मनांबाबत आहे ही कविता -- तुम्ही घिसीपिटी नासमझ कॉमेंट दिल्यामुळे हे सांगावे लागते आहे --

सारांश म्हणजे ही कविता पूर्ण उपरोधिक आहे !

गणेश ह.दिघे वा, वा -- तुझ्या कन्येचे जरा उशिरा अभिनंदन
आणि तिला खूप शुभाशीर्वाद !

कोणतीही ' बाजू न घेता ' केलेले खुले उत्तम विश्लेषण ! ( राहुल पुंगलिया )

Mohan Des! वा वा किती हे मूलभूत ! हेही मनाचेच तर आहे ! म्हणूनच कंटाळवाणे ! आता फक्त एक पाऊल टाका पुढे की झाले !

तेच कृष्णमूर्ती सांगतात. तुम्ही माझ्यावर अवलंबून राहू नका, म्हणतात. होय -- खूपजण असे करतात -- पण इतरांबद्दलचे निष्कर्ष काढत बसण्यापेक्षा आपले काय चाललेले आहे, हेच बघावे लागणार.

घरी एकट्याने बसून कलासंपर्क करणारे, समूहात बसून एंजॉय करणारे, गंभीर, विद्रोही, विनोदी असे सर्व प्रवाह कलेत असणार. प्रश्न हा आहे की जगण्यातल्या मूलभूत प्रश्नांचा आवाका घेणारे, जगण्यातल्या जटिलतेचे समग्र भान निर्माण करणारे असे कलावंतच फारसे निर्माण झाले नाहीत. ती आच आणि तातडी वाटणे हे फारसे घडले नाही. त्यामुळे भाषावैभव आणि थोडेफार तंत्रकौशल्य आणि चमत्कृती यांचे स्तोम माजले. विविध गुणदर्शनाची कला निर्माण होत राहिली. वाचक-प्रेक्षक यांच्या अपेक्षा धुडकावून, नुसत्याच प्रस्थापित बौद्धिक, नैतिक मूल्यांना महत्त्व न देता सखोल समजूत निर्माण करणारे कलाकारच फारसे आले नाहीत. दुसरे म्हणजे तशा कलेची इथे कुणाला फारशी अपेक्षाही नाही आहे.

Champra Deshpande
कोणत्याही कवितेची वा कवीची कोणत्याही कारणाने हेटाळणी वा हिडिसफिडीस करणे हे फारच बालिश कट्टरपणाचे असते. असल्या मतप्रदर्शनाला किंमत देऊ नये. लोकांना कविता लिहावीशी वाटते हेच मुळात महत्त्वाचे समजायला हवे. कोणत्याही कवितेत वा कवीत कुणाला काही त्रुटी वा दोष आढळल्यास ते सभ्य भाषेत सांगता येतात. पण अर्थात ते सांगताना सांगणारा उघडा पडण्याचा धोका असणारच. स्वमताबद्दल इतक्या आग्रही असणाऱ्याने तो पत्करायला हवा. कवितेचे तंत्र-मंत्र कुणालाही जन्मत: प्राप्त नसते. कुणालाही नाउमेद करायचा हक्क कुणीही स्वत:कडे घ्यावा, हे घातक आहे. येऊ द्यात कविता -- मुबलक येऊ द्यात ! आणि तुलना कशाला ? कवितेच्या अनुभवद्रव्यावर तिचे मूल्य अवलंबून नसतेच. अभिव्यक्तीच्या नमून्यावरही नसते. मग काय ? असा प्रश्न विचारायची हिंमत आधी असायला हवी. हजारो प्रकारच्या शैलींतून उत्तम कविता येऊ शकतात, हे प्राथमिक भान तरी सर्वांना असायला हवे.

अनुभव दलिताचा आहे की मध्यमवर्गीय आहे, युद्धाचा आहे की ऑफिसातला आहे यावर साहित्याचे मूल्य अवलंबून नसते. तसेच, शैली रोमँटिक आहे की वास्तववादी की अतिवास्तववादी यावरही ते अवलंबून नसते.

जगण्यातल्या मूलभूत प्रश्नांबद्दल असा सखोल विचार करायला लागावा असे साहित्य मराठीतही निर्माण होत राहो, हीच या निमित्ताने सदिच्छा !

कलेच्या क्षेत्रात मतभेद असायला हरकत नाही पण एकमेकांना हिडीसफिडीस करणे नसावे. कला ही माणसांना एकत्र आणणारी बाब आहे, भांडणे निर्माण करणारी नाही.

ही पोस्ट वाचून माझ्या मनात काहीसे अपराधी भाव जागे झाले. मी तर कवितासंग्रह घेतला वाचायला की तो पूर्णच वाचतो. लगेच त्यावर अभिप्रायही देतो. असे अनेक कवितासंग्रहांबाबत घडलेले आहे. उदाहरणार्थ कालच राहुल पुंगलियांच्या ' गावाबाहेर ' वर मी लिहिले आहे. यावर विचार करता मला असे दिसते की कविता वाचताना मी खूप लवचिक, तरल असतो. माझी लुडबूड थांबवून कवितेलाच बोलू देतो. याचाच अर्थ कविता मला ' पोचणे ' हे माझे नसतेच कर्तृत्व. मी स्वत:ला त्या वेळी खूपच ' कमी ' केलेले असते. याचा सारांश असा दिसतो की कविता ' मला ' कधीच नाही समजत. ती '

Premanand Gajvee मित्रवर्य, तुम्ही फार महत्त्वाचे काम करत आहात ! ही आच आणि भान यांचा प्रवाह वाहात असणे हे एकूणच माणसाच्या दृष्टीने आणि विशेषत: कलेच्या क्षेत्रात अत्यावश्यक आहे ! ( तत्त्वचिंतक नाटककाराचा शोध )

मलाही अनेक अनोळखी स्त्रियांच्या फ्रेंड रिक्वेस्ट येतात -- त्यांत एकही म्युच्युअल फ्रेंड नसतो -- त्या त्या स्त्रीच्या प्रोफाईलवर काहीही माहिती नसते. असे ' सौंदर्य ' पाहाताक्षणी मी ते देशोधडीला लावत असतो ! त्यांचे फोटो कोणत्याही वयात भुरळ पडावी असे असतातच. पण, पूर्ण जग ही माया असली तरी या सत्यापासून मात्र लांब राहणे अत्यावश्यक आहे !

" या कवितांचे वैशिष्ट्य म्हणजे त्या इंग्रजी भाषेच्या व्यावहारिक वापरातले व्याकरणाचे सगळे नियम पाळून लिहिल्या गेलेल्या कथनात्म कविता (Narrative Poems) आहेत. अनेकदा गद्यलेखनात ज्याप्रमाणे आपण Left Aligned वाक्ये लिहितो तश्या त्या Left Aligned Text आहेत. परंतु त्या गद्यसदृश्य लिखाणात जे 'काव्यमूल्य' निर्माण होते ते प्रशंसनीय आहे.
मराठी कवी, कवितेचे अभ्यासक, समीक्षक आणि वाचक यांनी याप्रकारच्या Narrative Poemsकडे सहृदयतेने आणि काळजीपूर्वक बघितले तर एक मोठा प्रश्न निकालात निघेल आणि मराठी कवितेचे एक पाऊल का होईना पुढे पडेल, अशी आशा वाटते. " -- हे तुमचे विवेचन मला विशेष महत्त्वाचे वाटले. तुमच्या सहृदयतेचे उदाहरण तुमच्याच लेखनात आलेले आठवले -- " एवढेच नव्हे तर सामान्यतः जिला परंपरेने काव्यभाषा म्हटले जाते तिचा अभाव असलेल्या "अकाव्यात्म' भाषेतही कविता लिहिली जाऊ शकते हे अगदी समकालात कविता लिहिणारे श्रीधर तिळवे, चंप्र देशपांडे, सलील वाघ इत्यादी कवींच्या रचनांतून दाखविले जाऊ शकते. "
-- 'अप्रगल्भ समीक्षका'चे कवितावाचन ' – गणेश कनाटे. – १२ जुलै २०२०.
-- हे मूल्यात्म विधान असेल वा नसेल, पण, यात स्वीकार नक्कीच आहे. कोणताही कवी आता मी प्रयोग करतो, वेगळे लिहितो, असे ठरवून काही करत नसतो. त्याच्या जगण्याच्या प्रक्रियेतून ते येत असते. ही समज अधोरेखित करणारे हे विवेचन मला आपल्या इथल्या वातावरणात खासच वाटते.

Champra Deshpande
अणुरणिया थोकडा म्हणजे प्रभावयुक्तता ( किंवा प्रभावग्रस्तता ) आनंतता म्हणजे तीतून बाहेर पडणे -- निव्वळ प्रतिक्रियात्मक नसणे -- एलकुंचवार त्याबद्दलच बोलत असावेत --
व्यक्तिगत प्रभावयुक्ततेतून बाहेर पडणे म्हणजेच अनंतता. कलेचे हे मूल्य वैशिष्ट्य हे इथल्या आणि जगातल्या अनेक कलावंतांनी सांगितलेले आहे. याचा अर्थ कला निव्वळ प्रतिक्रियात्मक नसणे. याची आच वा तातडी नसलेले अनेकजण असू शकतात. हे कुणी कुणाला ' पटवून ' देण्याचे मूल्य असूच नाही शकत.

भूतकाळाशिवाय मन -- असे काही म्हणत असाल तर ते आध्यात्मिक होईल ! विचार व्हावा !

' मराठी कविता ' यावर मी एक लेखच लिहिणार आहे -- पूर्वी क्षकिरण झाले, आता ज्ञकिरण येतील !

कवितेतले अनुभवद्रव्य स्वानुभवातले असो की वर दिलेल्या तंत्रातून येणारे असो, निर्माण होणाऱ्या कवितेत कवीची कलासमज आणि त्याची आकलनप्रक्रिया हेच व्यक्त होत असते. ती प्रक्रिया जर उथळ असेल तर कितीही काबाडकष्ट वा आदळ आपट करा, कविता उथळच येणार. बांधणे, सुचणे, जे असेल ते त्या प्रक्रियेतच घडायला हवे.

' तुमचे जे काही आकलन असेल ते ' असे म्हटलेच आहे आणि ही सर्वांच्याच ' बसकी बात ' नाही हेही !उदाहरणादाखल एक अट्टाहासदर्शक कविता विडंबनात्मक केली पाहिजे. ' मराठी कविता ' यावर मी एक लेखच लिहिणार आहे -- पूर्वी क्षकिरण झाले, आता ज्ञकिरण येतील ! सर्वांच्याच ' बसकी बात ' नाही -- हे मान्यच आहे -- धन्यवाद !

अध्यक्ष हा कट्टर जातवादी पुरोगामी नसावा म्हणजे झाले, बाकी कुणीही चालेल !

पुरस्कारांच्या फुलबाज्यांमुळे जिवंत आहेसे भासणारे ' अभिजात ' भाषेचे साहित्यक्षेत्र !

आणि विवेकी लोक गधडे, ढोंगी, हिंसक आणि आत्मवंचक असतात !

स्वत:ला विवेकी समजणारे वाढलेत एवढेच !😁
विवेकी अब्सर्ड हा उपरोध आहे.

The mind is often understood as a faculty that manifests itself in mental phenomena like sensation, perception, thinking, reasoning, memory, belief, desire, emotion and motivation. Brain is a physical existence and mind is its activity.

आनंद वाटला ! हा ' कवी ' आवडणारे आणखीही कुणी आहेत मराठीत ! ( James Tate. )

· Reply
· 7w

Vasant Dahake
Champra Deshpande आपली ही पोस्ट येण्यापूर्वी ही कविता मी वाचली होती व माझ्या भाषणात तिचा उल्लेख केला होता. आपण आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की कवितेच्या नावाखाली हा गद्य खपवीत होता. तर गद्य म्हणजे काय असा प्रश्न मला पडला. कथा, ललित लेख, निबंध, पत्र, रोजनिशी, दस्तऐवज, वार्तापत्र, भाष्य, बातमी, जाहीर सूचना, निविदा, अहवाल ? म्हणजे यांपैकी हा काय खपवीत होता ? ते पाहावे म्हणून हा मजकूर येथे टाकला.
1

· Reply
· 7w

Champra Deshpande
Vasant Dahake ते माझे नव्हते म्हणणे -- इथल्या काही लोकांना कविता म्हणजे ती अमुक अशीच असायला हवी असे वाटते, ते माझ्या काही कवितांना गद्य म्हणत होते -- त्यांना उद्देशून ती उपरोधिक पोस्ट होती. माझ्या दृष्टीने हा एक उत्तमच कवी आहे !

· Reply
· 7w

Champra Deshpande
तुमची परवानगी गृहीत धरून शेयर करतोय --

· Reply
· 7w

Vasant Dahake
जरूर
1
· Reply
· 7w

२८-०९-२१.

बेष्टम बेष्ट ! ( रवींद्र लाखे ).

dhanyavAd ! तुझ्या स्नेहाने प्रभावित ! ( निसर्ग देशमुख ).

मग राहते काय, पुस्तकाची समीक्षा होणे आणि त्याला पुरस्कार मिळणे ! समीक्षक संपलेले आहेत आणि पुरस्कारांची मला फिकीर नाही !

या बाबतीत मला चित्रकार गायतोंडे यांचे हे वाक्य महत्त्वाचे वाटते -- " चित्र काढत असतानाच फक्त मी चित्रकार असतो, एरवी मी फक्त एक माणूस असतो. " मीही सतत लेखकबिखक नसतो !

न फसणारे शहाणे जे आहेत त्यांना असे एका ठिकाणी थांबू नका हे सांगण्याचा हा प्रयत्न आहे. मनाला लावून घेणे ? ये तो हो ही नही सकता ! तुकाराम ही व्यक्ती वा नाव याचा नाही प्रश्न -- ' मलाच कळते ' हे अडथळा होऊ लागले तर ते हटवायचा प्रयत्न होणारच ! वाईट वाटून घेऊ नये -- 😌😀 जाता जाता या कविता कशा वाटल्या त्यावरही बोल ना -- नुसतीच मौलिक चर्चा नको -- राग आला तर मुद्दा टाळला जातो -- तसे होऊ नये --मीही तुझ्याबद्दल आदर बाळगूनच बोलतोय -- तू ज्याला टाकाऊ म्हणतो आहेस ते अनेकांना महत्त्वाचे वाटते आहे -- त्यामुळे तुझे मत टाकाऊ असण्याची एक शक्यता राहू दे समोर -- तुला त्या दोन कवितांबद्दल बोलायचे टाळावे लागले हेही लक्षात घे -- या असल्या स्थितिशील हेकटपणामुळेच मराठी कवितेची वाट लागलेली आहे -- ते मी अर्थात सकारण उदाहरणांसहित मांडणार आहे -- नुसतेच ' टाकाऊ ' वगैरे निरर्थक शब्द नाही वापरणार -- ' मराठी कविता ' या माझ्या कवितेबद्दल तू काहीच बोलू शकला नाहीस -- एक उथळ चर्चा केलीस -- नुसतेच काही कंडेम करण्याला काय किंमत राहणार ? टाकाऊ, भरताड हे नुसते कंडेम करणारे शब्द आहेत -- तुझ्या असल्या शब्दांमुळे मला पुन्हा कॉमेंट द्यावी लागली -- माझ्या कविता ज्यांना गांभीर्यपूर्वक चांगल्या वाटताहेत त्यांनाही कृपया क्षुद्र लेखू नकोस -- मतभेद असणारच पण नुसतेच हेटाळणीचे शब्द वापरायचे असे चीप स्वरूप येऊ नये चर्चेला --मुळात तो शब्द हवेतला आहे -- त्या वाचकांना आपण च्युत्ते म्हणणार का ? तुझी असतील काही तत्त्वे आणि निकष -- जग त्यावरच चालावे असे म्हणता येत नाही -- अजूनही तू त्या दोन कविता आणि माझी ' मराठी कविता ' हे का टाकाऊ आहे त्यावर लिही -- मी उत्सुकतेने वाचेन --पुन्हा तेच ! आता टाकाऊ, भरताड यांच्या ऐवजी सामान्य हा शब्द वापरला आहेस ! तुला माझ्या कविता आवडत नसतील म्हणून अशी चिडचिड करून काय उपयोग आहे ? तुझ्याकडे बोलण्यासारखे काहीच नाही आहे, नुसताच आवडीनिवडीचा प्रश्न आहे. तुझ्यासारखेच काही आणखीही कवितेचे वाचक आहेत, त्यांना या कविता खूप चांगल्या वाटताहेत. या कवितांच्या आशयाबद्दल माझी मला क्लॅरिटी आहे, हे एक आहेच. तू वाचणे आणि तुझी नावड सांगणे, हे फायनल नाही असू शकत. तुझा प्रॉब्लेम मला आलाय लक्षात, पण, त्याला मी काही करू नाही शकत. कवितांच्या बाबतीत बोलायची -- नुसतेच हेटाळणीचे शब्द वापरायची ही तुझी पद्धत अतिसामान्य आहे, हे समजून घे, जमल्यास यात बदल कर. तुझी नुसतीच निरर्थक चिडचिड तू व्यक्त करत राहिल्यामुळे -- जी चर्चा सुरूही नाही झाली ती आता खुंटलेली आहे. असो. थांबू या इथे.

अर्थात, तेही व्हावेच --

सवंग काय आणि मूल्यवान काय याचीही चिकित्सा व्हायलाच हवी --

Shridhar Tilve
You caught the ethos perfectly.

मराठीत एक तर समीक्षक नाहीत -- इतरांत बरेच फिक्स मतांचे बंदिस्त लोक आहेत आणि आपण कुठल्या टोळीतही नाही -- या वातावरणातच जर लाज नाहीय तर आपण लाजावे कशाला ? बेधडक आपले प्रामाणिक मत सांगून टाकावे ! 😀सगळ्या टोळ्या स्वत:ला प्रामाणिकच समजतात ! ते सगळे आपली मते फायनल समजणारे, थांबलेले लोक असतात ! कला ही टोळीबाहेरच असू शकते हे समजणारेही काही असणारच ! त्यांना नाकारले जाण्याची खेदखंत करून चालतच नाही. पण स्वत:ला उभे राहण्यापुरती तरी जागा करून घेण्यासाठी जमेल तेवढे परखड राहावे लागते. ही सदर कविता काहींना नसेल आवडली पण बऱ्याचजणांना ती महत्त्वाची वाटलेली आहे. हे

चालतच राहणार. ' मोकळी हवा ' आणि ' कवितांचे परीक्षण ' या माझ्या पोस्टही पाहाव्यात. ये काम तो जोरसे चलेगा. सारख्या अशा कविताच लिहिल्या पाहिजेत असे नाही. आपल्या कामाची आपल्याला क्लॅरिटी असेल तर मतमतांतरांबद्दल सहिष्णू राहता येते. इथे स्वत:ला ' महाकवी ' म्हणवून घेणारेही काहींना गोड वाटलेले आहेत. त्यामुळे, समजून राहात आपले काम करत राहणे हाच उपाय. ' तुम्ही असे करा ' असे सल्ले द्यायला लागला माणूस की तो कलेतले फारच प्राथमिक नियम मोडतोय, आणि हे बरे नव्हेच.मी जो लेख लिहिणार आहे त्यात सविस्तर सगळे येईल -- या कवितेत हीच नावे का आली, हेही येईल -- आणखी का आली नाहीत, हेही येईल -- स्वत:ला उभे करण्यालाच महत्त्व द्यायचे असते तर मराठीत खूप सोपे मार्ग आहेत -- ते न स्वीकारल्यामुळेच तर परखडपणा लागतोय -- मराठीतले ९९ टक्के कवी हे स्वत:ला प्रोजेक्ट करत बसणारे आहेत -- वेगळी कविताही असणारच -- मूल्यमापनही चालूच असते -- कविता अमुक अशी नसेल तर ती कविताच नव्हे असे म्हणणारे मूल्यमापनच करत असतात -- तेच स्वातंत्र्य सगळ्यांना असणार -- आपापले लिहीतही राहू आणि मूल्यमापनही करत राहू -- मी जो लेख लिहिणार आहे त्यात सकारण मूल्यमापनही असणारच आहे -- सारांश, लिहीत राहावे, हेच खरे -- तुला नावांचा राग आलाय की काय अशी शंका येते -- यात कुणालाही महा वा ग्रेट म्हटलेले नाहीय -- या मार्गाने कोण गेले, असे आहे -- तुला काही खटकले असेल, आवडले नसेल, हे समजू शकतो पण हे होत राहणारच ना ! लेख झाला की तो तुलाच छापायचा आहे !🙂
चलो, जय हिंद, जय महाराष्ट्र !

नाटकात ' नाट्यात्म विधान ' आणि एकूणच कलेत ' हाताला काही लागणे ' या अपेक्षा कलेतली सर्जकता खतम करणाऱ्या आहेत. मराठीत तरी या खुज्या अपेक्षांचा उच्छाद आहे !

खूपच चांगली मान्यता ! ( रमेश औंधकर )
महामस्त ! ( रमेश औंधकर )

**२३ सप्टेंबर २०२१.**

' हऱ्या नाऱ्या झिंदाबाद ' मध्ये निळू फुले आणि रामभाऊ एकदा पोलिस म्हणून नोकरीत असतात. इन्स्पेक्टर म्हणतो की आज रात्री आपल्याला एका ठिकाणी छापा टाकायचा आहे. रामभाऊ विचारतात, किती वाजता ? तो म्हणतो, साडेनऊ वाजता. त्यावर रामभाऊ म्हणतात, मग ठीक आहे, म्हणजे, जेवून येता येईल !

मूल्यमापन ही नंतरची बाब आहे -- त्या कामाची आवड जो तो जोपासत राहीलच. प्रश्न, कविता म्हणजे असेच, अमूकच, असे म्हणण्याचा आहे.

Balkrishna Kawathekar sentimentalism, emotionalism टाकून देणारी खूप कविता लिहिली जाते जगभर -- इथेही कुणाला त्या मार्गाने आपोआप जायचे असेल तर जाऊ द्यावे -- आपण जी बुद्धिप्रधानता म्हणतो ती बऱ्याचदा बुद्धीला वा तर्काला बांधील नसते, हेही समजून घ्यायला हवे. मराठी कवितेत व्यक्तिगत सुखदु:खे, मूडस आणि राग-लोभ-क्रोध यांचे प्रचंड स्तोम माजलेले आहे. वेगळी कविताही येत राहणारच. स्वागतशील राहायचे की नाही हा वाचकांचा प्रश्न आहे. एलियट escape from emotion का म्हणतो, anti poetry कोणत्या कारणांनी येते, हेही समजून घ्यायला हवे. इथली माती, तिथली माती याच तत्त्वज्ञानात ज्यांना अंतिम वाटत असेल त्यांचा प्रश्नच नाही. भावनिकतेत डुंबून राहणे हे मराठी कवितेचे डबके होण्याचे प्रमुख कारण आहे.

Balkrishna Kawathekar तुमचे हे मत आहे -- मला मान्य नाही. असो.

हा तर एक प्रचंड अनपेक्षित प्रकार आहे -- हा साचा वाटणे ही या कवितेसारखीच एक गंमत !

जॅक पोलॉक नामक एक चित्रकार होता. त्याच्या चित्र शैलीला ठिबक चित्र वा कृती चित्र वा सर्वंकष चित्र म्हटले जाते. त्या शैलीत लिहिलेली ही एक कविता आहे.

अर्थपूर्ण कविता लिहिणारे खूप आहेत -- अर्थहीनचासुद्धा आवाका घ्यायलाच हवा -- आणि कवी जेव्हा प्रामाणिकपणे काही पाहात असतो तेव्हा इतरांनी कृपया त्याला सल्ले देऊ नयेत --Aniket Sonavane वा रे वा ! अत्युत्तम कॉमेंट ! धन्यवाद !

एक तर यात एकाच व्यक्तीची वाक्ये नाहीत आणि कवितेतला मी म्हणजे मी स्वत: नाही.

ही भाषिक टिप्पणी आहे ! राजकारण वगळून साहित्यिक वगैरे असले की लगेच माणूस असंवेदनशील ठरतो इथे ! कलावंताचा राजकारणाशी संबंध असू नये, ही तुमची भूमिका इथे प्रतिगामी ठरेल ! सोचो ! एका चॅनेलवर आलेली ही एक पट्टी आहे. मोठमोठे विद्वान हसू होण्याची भीती न बाळगता बिनधास्त बोलत असतात -- तुम्ही कलावंतांना याची भीती घालणे योग्य नाही ! सोचो ! 😀 ( पोस्ट मधल्या वाक्यातली चूक तुमच्या लक्षात आली नसावी -- )
हे भाषिक असल्याचे तुम्हाला कळले नव्हते हे एक दुर्दैव आणि स्वत:च्या भूमिकेच्या विरोधात तुम्ही सल्ला दिलात हे दुसरे ! ' भूमिका घ्या ' हा सल्ला देण्याची भूमिका असण्याचा जो रोग आहे त्याबद्दल मी बरेच लिहिलेले आहे, त्यावर आता पुन्हा नाही बोलत. तुमच्यासारखे परिपक्व होणे मला झेपणारे नाही -- माझ्या कुवतीप्रमाणे बालिश असण्याचे स्वातंत्र्य मला कृपया असू द्यावे, हीच नम्र विनंती !
छान ! तुम्ही बालिशपणा चालवून घ्या, मी भ्रमिष्टपणा चालवून घेतो ! आपण दोघेही सहिष्णू !

कोणत्याही कलाकृतीत ' सगळे ' कधीच नसते -- ती कलाकृती सगळे सुचवू मात्र शकते ! तेही वाचक खुला राहिला तरच ! वाचकाला त्याची अपेक्षापूर्ती हवी असेल तर ती कधीच ' सगळी अवस्था ' असू शकणार नाही. तुमच्या मनातली ' सगळी ' कविता तुम्हालाच लिहावी लागेल -- दुसरे कुणी लिहू नाही शकणार. की रॅप हा प्रकारच तुम्हाला मान्य नाही ? तसे असल्यास नाइलाज आहे.
रॅप खूप आवडलं. कारण अलीकडे मी निरनिराळ्या भाषेतली रॅप ऐकण्याचा सपाटा लावला आहे. रॅपची सर्व वैशिष्ट्ये यात अचूक उतरली आहेत. या माध्यमात रॅप बोल टाकायचा हा पहिला प्रयत्न असावा.

Champra Deshpande
Awdhoot Parelkar वा, हा अभिप्राय मोलाचा !

Swapnil Chavhan तुझी दाद अर्थातच अनेक कारणांनी सार्थ !

Leena Pandhare हे खरे असावे -- मी वापरायचा मेंदू आणि दाखवायचा मेंदू हे वेगवेगळे ठेवत आलोय -- ते मात्र बरे चाललेय ! 😀

जावेदजींच्या मला आवडलेल्या ओळी --

हम जिसे गुनगुना नहीं सकते
वक़्त ने ऐसा गीत क्यूँ गाया

एका क्षणात दिसलेल्या अनेक गोष्टी ! ( प्रज्ञा दया पवार यांची कविता )

दोन दिडक्यांची भांग तोच इफेक्ट देते.. -- हे संशयास्पद वाटते -- ध्यान आणि भांग एकच असेल तर डॉक्टर सरळ भांगेच्या गोळ्याच देतील -- पण तेही ध्यानाचेच बोलतात.

बौद्धिक समग्रता असे काही अस्तित्वात असूच नाही शकत -- त्याला इलाज नाही !

तुम तो महाभाग्यवान आदमी हो ! ( भाग्य या शब्दातली अंधश्रद्धा वगळली तरी ! ) – राजीव नाईक यांची शिक्षक दिनाची पोस्ट.

वाईट वाटणे आणि त्याच्याकडून शिकणे -- दोन्ही आहे --

देव जोडे तरी करावा अधर्म । अंतरे ते कर्म नाचरावे ।।

अभ्यासू, समतोल विचाराचा समीक्षक ! ( जयंत पवार )

खरोखरच -- इग्नाशियस डायस यांच्या कविता अप्रतिम आहेत !

कोणताही मानसिक पवित्रा म्हणजे पोझिशनच -- मराठी सारस्वताला फिट बसणारी टोपी ! ( तिळव्यांची कविता )

Girish Patke तू म्हणतो आहेस ते खरेच आहे -- बघू -- दोनचार दिवसांत, ही पोस्ट वाचून मनोज काही म्हणतो का, ते पाहू --
Manoj Pathak
सर,
सर्वप्रथम वर्णमुद्रा तर्फे व व्यक्तिश: मी आपली जाहीर माफी मागतो.तुमच्या पुस्तका सोबतच इतर अनेक मित्रांची पण पुस्तकं मागील वर्षभरात रखडली आहेत.त्या बद्दलची सगळीच कारणे इथे सांगता येण्यासारखी नाहीत.' तंबाखूची टपरी ' आपल्याला (च) काढायचे आहे , असेही स्वत:ला अनेकदा बजावून सांगितले होते, पण तरीही त्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी काही जुळून आल्या नाहीत.अगदी आजही सगळेच अनिश्चित आहे.वर्णमुद्राचे पुढे काय करायचे आहे यावर विचार सुरू आहे, लवकरच काही निश्चित ठरू शकले तर तुमचे पुस्तक प्रकाशित करण्यात आनंदच होईल.अर्थातच त्यावेळी तुमची संमती असली तरच.दरम्यान तुम्ही म्हणताहात तशा कविता वेबसाईट वर टाकावयास काहीच हरकत नाही, त्यामुळे पुस्तक प्रकाशित करण्यात काही अडचण येणार नाही.
कृपया आपण समजून घ्याल व मनमोकळ्या पणाने, मोठेपणाने मला क्षमा कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो.
🙏🙏🙏
Champra Deshpande
Manoj Pathak हे अत्युत्तम आणि मान्य !

**२५ ऑगस्ट २०२१.**

कवितेबाबतच्या सरधोपट कल्पना मनात घट्ट धरून न ठेवता ही ग्रेट कविता वाचली जावी, हीच मराठी सारस्वतासाठी सदिच्छा ! ( लाख्यांची कविता ‘ शोधाचा शेवट ‘ )

मृषा -- absurd.

एक काही वर्षांपूर्वीची घटना सांगतो. माझे दोन मित्र बारमध्ये बसलेले होते -- मी तिथे नव्हतो. एकजण दुसऱ्याला माझ्याबद्दल म्हणाला की आम्हाला या माणसाबद्दल इतकी आपुलकी वाटते, प्रेम वाटते, पण, याला आमच्याबद्दल असे काही वाटते की नाही, ते कळतच नाही कधी. हे ऐकून माझा तो दुसरा मित्र ( जो कवी होता ) हसला आणि म्हणाला तो नाद द्या सोडून कारण ते कळण्याची शक्यताच नाही ! -- आता हे काही माझे भूषण नाही किंवा माझे एक डावपेची वागणे नाही. जगण्यातल्या असंख्य प्रभावांतून कुणाचाही स्वभाव घडत असावा. शिवाय गंमत म्हणजे, सगळ्यांचे हेच असेच मत बनते, असेही नाही ! आणि लेखन म्हणाल तर व्यक्तिगत सुखदु:खांचे लिहिण्यात मला फारसा रसच नसतो. सहज एक योगायोग म्हणावा अशी कालच मी इथे दिलेली माझी ' वाटतच नाही ' ही कविता वाचा.

हे मान्य नाही -- कविता म्हणजे नुसतीच एक शब्दांची रचना नसते -- ती जगणे समजण्याची प्रक्रिया असते -- ती प्रक्रिया पुस्तकी अभ्यासावर अवलंबून नसते -- उलट तसल्या अभ्यासाचे ओझे हे अडथळा ठरू शकते --

शब्दांचा वापर ' अमाहीत ' असणे -- असा करून पहा विचार --
तसे नाही -- माहीत असलेल्या शब्दांचा अमाहीत वापर --

त्यासाठी, जमल्यास, आधीच काही न ठरवता, या कविता वाचत राहणे, हाच उपाय आहे !

बरे झाले, ही कविता मी कालच इथे देऊन ठेवली ते ! मी लिहिली तिथे ती सेव्ह झालीच नव्हती ! अर्थात, एवढे काय महत्त्व आहे एखादी कविता टिकण्याचे, हा प्रश्न असणारच म्हणा !

एका नाटकात पती पत्नीला म्हणतो, " आपल्या लग्नात तुझ्या माहेराहून एक छान तवा आला होता बघ आहेर -- " त्यावर पत्नी म्हणते, " तवा नव्हता तो, चांगली कढई होती -- " यावर पतीच्या भूमिकेतले शरदराव म्हणतात, " होय ना -- तवा म्हणजे उथळ कढईच ना ! " यावर प्रचंड हशा पिके ! तो संवाद अजून माझ्या लक्षात आहे ! मोठा अभिनेता !

अहो, कवीलाच जर सत्य समजत नसेल तर तुम्ही म्हणताय ती जबाबदारी त्याला कशी पेलता येईल ? ज्याला ' सत्य ' समजते त्याने घ्यावी ती जबाबदारी.
समोर ' गोंधळ ' आहे, ' सत्य ' नाही हेच आकलन कवी इथे व्यक्त करतो आहे. एखाद्या वाचकाला असेलही सत्याचे आकलन, त्याचे आकलन व्यक्त करण्यासाठी कुणी कवी कविता लिहिणार नाही. तशी कविता ' सत्य ' समजणाऱ्याने स्वत:च लिहायला हवी.
अगदी बरोबर -- धन्यवाद !

**रीलया :**

युटोपियन आणि डिस्टोपियन कथांचा आविष्कार
नेहा भांडारकर
नागपुर
(मोबाइल 9823746521)
ग्रेटच ग्रेट समीक्षण ! अशी आशयवेधी समृद्ध समीक्षा क्वचितच वाचायला मिळते ! तोला मोलाच्या कथांचे तशाच गांभीर्याने केलेले हे समीक्षण वाचून खूपच आनंद वाटला ! अत्यंत चिंतनशील आणि मर्मवेधक असे हे समीक्षण आज समीक्षेच्या क्षेत्रात आवर्जून अभ्यसनीय ठरावे, असे आहे !

**१३ ऑगस्ट २०२१**

कवितेतला मी म्हणजे स्वत: कवीच असे नाही -- तो एक पोएटिक पर्सोना -- काव्यगत व्यक्तित्व असतो --

निसर्गप्रेमातून येणारी समर्पण भावना आणि त्यातून सर्व मानसिक गोंधळ नष्ट होण्याची जिवंत प्रक्रिया यांचा छान प्रत्यय देणारी रचना ! साधेपणा आणि सर्जकता यांचे उत्तम संमीलन ! ( चित्रा जोशी यांची पोस्ट – नर्मदाशातकं )

अत्यंत अप्रतिम लेख ! सुंदर !!! ( लीना पांढरे यांचा रवींद्रनाथांवरचा लेख )

Edith Sitwell coined the term "abstract poetry" to describe poems in which words are chosen for their aural quality (i.e., sound) rather than primarily for their sense or meaning. Poets sometimes seem to favor sound over sense -- शब्दांचे रूढ अचूक अर्थ ' सोडले जाणे ' याबद्दल हे आले. नेटवर चक्कर टाकलीत तर यावर बरेच सामान मिळेल. जगात अनेक कवींनी अमूर्त कविता लिहिलेल्या आहेत. मी थोडक्यात असे म्हणेन की ' नेमका ' अर्थ सांगण्यासाठी होणारा शब्दांचा वापर आणि भान निर्माण करण्यासाठी होणारा वापर यांत फरक आहे. तरीही, आपल्यांत मतभेद असू शकतोच. त्याला इलाज नाही.

माणसांनी निर्माण केलेले शब्द माणसासारखेच यशाचे भिकारी ! ( लाखे )

महत्त्वाचा आहे हा विषय -- अन्नू मलिकला एकदा मेलडीबद्दल विचारले असता तो म्हणाला की प्रेम करायला अनेक महिने, वर्षेही उपलब्ध होती तेव्हा मेलडी होती -- आता शक्य नाही -- असा गोडवा करत बसायला वेळच नाहीय -- यस ऑर नो -- असे आहे आता --

काबाडकष्ट हाच अडथळा झाल्यामुळे न अवतरणाऱ्या कवितेची कविता – ( लाखे )

अजून प्रकाशित व्हायचा आहे तो लघुपट -- योग्य वेळी महेंद्रच देईल लिंक – ( पिझ्झा लघुपट )

विशेषच ! ( मुग्धा गोडबोले रानडे )

आस्वादक आणि चिकित्सक ! ( गिरीश पतके )

हमें कुछ नही चाहिये -- बारातियोंका स्वागत पान परागसे कीजिये, बस ! ( मराठी साहित्य मे यही तो सराहनीय बात होगी ! )

**०८ जुलै २०२१**

काहींना माझे इथले लेखन आवडते याची मला जाणीव आहे, पण , या माध्यमाचा पुरेसा आणि योग्य उपयोग झाला आहे करून, असे वाटते आहे. त्यामुळे, पाहू असे काही दिवस. हे काही व्रत वा शपथ घेणे नाही आहे. इतरही काही कामे चालू आहेत. त्यामुळे, सर्वांच्या सदभावना सविनय स्वीकारून सध्या तरी रामराम !

तुम्ही अगदीच शाळकरी भांडणासारखे बोलत आहात, त्यामुळे, आता मात्र मी तुम्हाला ब्लॉक करतो आहे.

एक म्हणजे मी तुम्हाला लिस्टमधून काढलेले वगैरे नाही. तुम्ही नसालच लिस्टमध्ये. इथे खूप मतभेद चालवून घेत आमच्या चर्चा चालतात. असो.

ढोल बडवणे वगैरे भाषाच तुमची मनस्थिती दाखवतेय ! असल्या प्रतिक्रिया पाहून कुणीही लेखकाने वा कवीने लिहायचे थांबू नये, असे मी नेहमीच म्हणत असतो. तुम्हाला माहीत नसावे -- मी गेली ५० वर्षे लिहितो आहे -- असले किरकोळ राग वगैरे छोड देता हूं मै !

मी कविता लिहिली तरी तुम्हाला त्रास होतो, तीवर लिहायची वेळ आली तर ( खेळाचे नियम मोडूनही ) मी लिहिले तर त्याचाही तुम्हाला राग येतो ! आता करावे तरी काय ? माझ्याकडे यावर उपाय नाही -- तुम्ही माझे वाचायचे बंद करणे हाच उपाय ! शिवाय, आत्ताच सांगून ठेवतो -- मी लिहितो त्या कविताच नाहीत, असे म्हणणारी काही फ्रेंडस मंडळी आहेत -- त्यांच्या सोयीसाठी, माझी एखादी कविता घेऊन, ती कविता का आहे, हे मी सांगणार आहे. ते वाचण्याचा त्रास तुम्ही घेऊ नये, ही विनंती.

कवीला लिहावे लागणे हे दुर्दैव असल्याचे म्हटलेले आहे !

आपण एक मुद्दा लक्षात घेऊ. कविता किती ओळींची वा लांबीची असायला हवी असा काही नियम नाही. कमी ओळींच्या अनेक कविता मराठीत मान्यताप्राप्त आहेत. उदाहरणार्थ ही घ्या पु. शि. रेग्यांची एक कविता --
गाथा
कितितरी दिसांनीं श्यामलिच्या तो
सहवासोत्तर शिकला
शरदातिल उधळ्या मेघपिसांना
पुन्हा पहावयाला.
-- ही रेग्यांची पूर्ण कविता आहे. अलीकडेच मी त्यांच्या ' शेवगा ' या कवितेवर इथे लिहिले होते -- तीही आठवावी.
बाकीची चालू द्या चर्चा.

अत्युत्तम विवेचन ! या पोस्टच्या निमित्ताने तुमच्याकडून हे लिहिले गेले हे या पोस्टचे एक महत्त्वाचे फलित आहे !
( लाखे )

( १ ) या ओळी मीच लिहिलेल्या आहेत. अतिवास्तववादाचे एक तत्त्व असेही आहे की वैचारिक अर्थाच्या अट्टहासात कवितेची प्रक्रिया न जखडता येतील तशा येऊ द्याव्यात ओळी. ब्रेटन तर म्हणतो की नंतरही त्यांत दुरुस्त्या करून सफाई आणायचा प्रयत्न करू नये. थोडक्यात, ज्या मनातून येणार त्या ओळी त्याची जी काय असेल ती चिंतनशीलता आपोआप त्या ओळींत येईल. त्यामुळे, अगदी प्राथमिक स्तरावर या ओळींकडे एक निरर्थक मजकूर म्हणून पाहावे. शाब्दिक वा वैचारिक अर्थाची आग्रही मागणी न ठेवता काय जाणवते ते पाहावे. ( २ ) खोट्या प्रतिमा, खोटी लयबद्धता आणि निरर्थक चमत्कृती हे मला चांगल्या कवितेसाठी अडथळे वा शत्रूच वाटतात. ते प्रात्यक्षिक देण्यासाठी म्हणून या ओळी लिहिल्या गेलेल्या असू शकतात. ( ३ ) एका बाजूला शब्दार्थ, वैचारिक अर्थ आणि दुसऱ्या बाजूला कृतीची सलगता. पण त्या दोन्हींत एकरूपता – सायुज्यता नसणे. माणसाच्या जगण्यातल्या विदीर्णतेचे हे एक प्रमुख कारण आहे. ते अभिव्यक्त करणे हेही असू शकते. कारण ही मला नेहमीच जाणवत राहणारी बाब आहे. याच अभिव्यक्तितंत्राने मी एक पूर्ण एकांकिका लिहिलेली आहे. ‘ संसाराणुपेंडघार ‘. त्या एकांकिकेका आय एन टी चे लेखनाचे पारितोषिक होते. पण एकांकिका लेखनातला हा प्रयोग पूर्णत: दुर्लक्षित राहिलेला आहे. लेखकाला वा कवीलाच स्वत:च्या कलाकृतीबद्दल बोलावे लागावे, याला दुर्दैवच म्हणायला हवे. ( ४ ) खोट्या चमत्कृतीला वाहवा म्हणण्याच्या सत्यतेची खिल्ली उडवणेही मनात असू शकते. त्यामुळे, खरे तर ते ‘ घंट्याचा ‘ होतो पक्षी असेही मनात आले असणार पण लिहिताना ‘ घंटेचा ‘ असे अर्थशक्यतेच्या अंगानेच लिहिले गेले. ( याचा पुढील भाग दुसऱ्या कोमेन्टमध्ये दिला आहे -- )

( ५ ) आता अर्थाच्या अंगाने पाहू. अंधार म्हणजे काही वाईट, मनाचा गोंधळ, दु:खी अवस्था. ती नष्ट होणे, तिचा खून होणे, तिची हिंसा होणे – ही भाषा गुन्ह्याची आहे पण हा वाईटाचा नाश आहे. आणि हा कुणाच्या उपस्थितीत झाला आहे तर सावळ्या सखीच्या. ही गालिबच्या प्रेयसीसारखीच आहे. ‘ सखी सावळी साक्षी ‘ यातल्या अनुप्रासाने तिच्याबद्दलची आपुलकी, लाड हे व्यक्त होते. खरे तर तिच्या साक्षीमुळेच ते घडलेले आहे. ती सावळी आहे. पूर्ण नीट दिसणारी, समजणारी नाही. हे अवधानाचे – भानाचे एक गूढ अस्तित्व आहे. आता या ‘ गुन्ह्या ‘ नंतर खटला दाखल होणे आणि शिक्षा होणे ही प्रक्रिया खरे तर अपेक्षित असणार. पण, निकाल येण्याआधीच त्या सखीच्या उपस्थितीमुळे ‘ घंटेचा होतो पक्षी ‘. जी घंटा वाजवून, द्वाही फिरवून गाजावाजाने निकाल होऊ शकला असता त्या घंटेचाच पक्षी होऊन उडून जातो आहे. आता त्या ‘ हिंसक ‘ घटनेचे काहीच शिल्लक नाही. जणू काही घडलेच नाही. कोणतीही घटना घडते ती एखाद्या केंद्राच्या संदर्भात असते. घटना घडलीच नाही याचा अर्थ केंद्रच राहिलेले नाही. म्हणजेच त्या सखीने वाईटाचा नाश केला याचा अर्थच मानसिक केंद्राचा नाश केला. आणि एकूणात काही घडलेच नाही असे स्वातंत्र्य निर्माण केले. सार्त्रच्या ‘ फ्लाईज ‘ या नाटकात ओरिस्टीस या पात्राचे असे सत्य दाखवण्यात आलेले आहे. अलीकडेच मी इथे दिलेली ‘ सार्त्र ‘ ही कविता पाहावी. एकूणात, घटनांचे सातत्य आणि वैचारिक अर्थ यांच्या अस्तित्वाबद्दलच ही कविता शंका उपस्थित करत आहे.

तर एवढे बास. मराठीत हा सगळा सहजच चेष्टेचा विषय होऊ शकतो याची मला कल्पना आहे. आहे ते टिकवून ठेवणे आणि नवे काही येऊच न देणे, हा प्रयत्न इथे सतत चालू असतो. कोणत्याही लिहिणाऱ्याने तसल्या गोष्टींची तमा बाळगू नये, असे मला वाटते. ‘ हे बघा माझे दु:ख – हे बघा किती वाईट जगणे ‘ एवढेच बोलत राहण्यासाठी असते का कविता ? कोणत्याही मताशिवाय आणि निष्कर्षाशिवाय जगण्याकडे पाहता येईल का, असा प्रश्नही पडू नये ? कवीही जगण्याकडे वैज्ञानिक दृष्टीने, स्वत:ची भावनिकता बाजूला ठेवून पाहू शकतो, हे लक्षात घ्यावे. म्हणजेच कवितालेखन ही घटनाविरोधी कृती नसून पूर्णत: घटनेशी सुसंगत असणारी ती एक महत्त्वाची प्रक्रिया आहे, हे समजून घ्यावे.

आता लौकरच ‘ कवितेचा आशय – २ ‘ ही पोस्ट देईन.

hesitant म्हणजे अनिश्चित -- लवचिक आकलन, असा एक प्रकार असतो जो मराठीत विसरला गेलेला आहे. मतांचे आग्रह न धरता एकत्र मिळून काही समजून घेणे. तरीही शेवटी, मतभेद राहिलेच तर टची न होणे !

अहो, दुखावले न जाणे, शत्रुत्व न मानणे, असे घ्या ना --

आपल्याकडे ' विवेका ' चे गोडवे गाण्याची पद्धत आहे -- ती वापरायची अशा वेळी --कबुलीत जरा उपरोध आहे -- हे कृपया पाहावे -- आणि दुसरे असे की स्वच्छंदी हा शब्द मराठीत रोमँटिक या अर्थी वापरला जातो. तुम्ही मला रोमँटिक कवी वा न-कवी म्हणताय की काय ? हे कुणालाच पटण्याची शक्यता वाटत नाही !

धन्यवाद !
मी तरी रागावलेलो नाही. पण , तुझे आकलन मीही अंतिम मानत नाही. हा मतभेद -- आकलनभेद नोंदवणे गरजेचे होते. तरीही, माझ्याही तुला शुभेच्छा आहेतच !ऐसा त्रागा मत करो -- मतभेद को मतभेद ही रहने दो कोई नाम न दो !😀

गद्य आणि पद्य असा एक ढोबळ फरक ठीक -- गद्य आणि काव्य असा फरक अमान्य.

मी इथे मधे बोलणे खरे तर योग्य नाही, पण , मित्रांतलेच तर आहे संभाषण, म्हणून बोलतो. कविता ग्रेटबीट ते राहू दे, पण , कोणतीही ठाम मते अंतिम नसतात एवढे म्हणून ठेवतो. ही कविता का आहे हे मी नाही सांगत बसणार, पण , आपली मते अंतिम धरून चालण्याची मराठीतली परंपरा नव्या लोकांनी तरी जरा सैल सोडावी. ज्यांना कविता म्हणून भरपूर मान्यता दिली जाते त्यांत बऱ्याचदा फक्त जरा लययुक्त एकरेषीय निवेदन असते, तसे इथे नाही आहे. नुसती व्यक्तिगत सुखदु:खे, भावभावना आणि प्रतिक्रिया देणाऱ्या कवितांना मी चांगल्या कविता समजत नाही. असो, पण , मतभेद मान्य. ( मंगेश नारायणराव काळे )

सत्यम ब्रूयात प्रियम ब्रूयात न ब्रूयात सत्यम अप्रियम -- असे सुभाषित आहे -- खरे बोला, प्रिय बोला पण अप्रिय असे सत्य बोलू नका !

तुमच्यामुळे आणि तुमच्या मित्र श्रोत्यांमुळे जंगी मजा आली ! वाह ! ( राजेंद्र मंत्री )

**२६ जून २०२१.**

एक पर्याय असा सुचतो -- तुकारामाने समजा जनसामान्यांना आधार वाटावा असे काही अभंग लिहिले आणि काही अभंग शुद्ध कविता -- त्याची जगण्यातली मर्मदृष्टी व्यक्त करणारे लिहिले. इथे लोकांना तुकारामाची मर्मदृष्टीच नाकारायची आहे की काय, अशी शंका येते.

ब्लर्ब जबरदस्त ! ( सचिन केतकर यांचे पुस्तक )

दिवाणजी म्हणतात, त्यांनी बोललेले मला आवडत नाही -- हे जरा दिशाभूल करणारे वाक्य आहे. मी त्यांना दोनतीनदा त्याचे कारण सांगितले होते. त्यांना न पटणारे किंवा न आवडणारे काही समोर आले की त्यांची बोलण्याची पातळी घसरते, हे आहे त्याचे कारण. त्यांनी इथे दिलेली कोमेन्टही तशीच आहे. हिडीसफिडीस करणे, चेष्टा करणे, विकृतीकरण करणे -- या चर्चेच्या पद्धती असू शकत नाहीत. याच कारणाने त्यांची हीही कॉमेंट मला ' आवडलेली नाही '. दुर्लक्ष करणे भाग आहे.

अशी चिंतनशील मुलाखत क्वचितच समोर येत असते -- सामान्यत: ' मी कसा यशस्वी झालो ' यावरच मुलाखती चाललेल्या दिसतात. नुसते नाटकच नव्हे तर एकूणच कला क्षेत्रातल्या सर्वांनी ही मुलाखत ऐकावी. ही काही ' अधिकारवाणी ' नव्हे पण विचाराला, समजून घेण्याच्या प्रक्रियेला नक्कीच चालना देणारी ही मुलाखत आहे. एक चांगली मुलाखत घेतल्याबद्दल मनाली काळे यांचेही अभिनंदन ! ( रवींद्र लाखे यांची मुलाखत ).

नोबेल म्हणून ठीके -- पण शास्त्रज्ञांनाच आता वेगळे काही दिसायला बंदी थोडीच आहे ?

अशा ठाम कल्पनांनी नवे काही सापडत नसते -- ओपन राहायला हवे -- शास्त्राची सुरुवातच चुकीची झालीय असे शास्त्रज्ञांनाच वाटत असेल तर तू न मी ठाम बोलून उपयोग काय ?

यास्मिन शेख यांचे ' मराठी लेखन मार्गदर्शिका ' हे पुस्तक मला अनेकदा उपयोगी पडत आलेले आहे ! उत्तम पुस्तक !

उत्तम तांत्रिक सफाई दिसते. हे आकार जवळचे, मधले आणि लांबचे वाटतात. आकार आणि त्यांच्या छटा यांचे वैविध्य गुंतवून ठेवणारे आहे. पार्श्वभूमीच्या छटाही चित्राला अर्थसघन करतात. भुरकट रंगाने काहीशी उदासी जाणवते पण त्या सर्वावर प्रभुत्व गाजवणारा उजवीकडचा मोठा आकार इतका भुरा नाही. चित्रातही मध्ये मध्ये उजळ भाग आहेत. पण एकूणात हे आकार समजत नाहीत. आजच्या जगण्याचे जणू हे एक प्रतिरूपच आहे. निराश होण्यासारखे असूनही निराश न होता जगणे आणि सोबत अनाकलनीयतेची भावना असणे. आशयघन चित्र !
( सुचिता तरडे )

हे पूर्ण चित्र उभ्या आकारांचे असून निळ्या, भुऱ्या , काळ्या, पिवळ्या रंगांत आहे. ही एखाद्या शहरातली एक उत्तुंग इमारत असावी, असे वाटते. वैविध्य आहे पण एक मुरलेला सराईत उत्साह आहे. या आकारांना अनेक मिती आहेत असे जाणवते. एकत्र असूनही जणू एकमेकांशी फारसे संबंधित नसणे जाणवते. प्रत्येक आकार आणि छटा यांत काहीसा विस्कळीतपणा जाणवतो. ही एक नाइलाजाची शहरी मनस्थिती आहे. जमलेले उत्तम चित्र ! ( शरद  तरडे )

गुंतूनही जायचे आणि क्षणातही पाहायचे अशी अप्रतिम चित्रे ! ( रमेश औंधकर )

कवीसह कुणालाच काही कळत नाही, अशी सुरुवात करायला कवी तयार असतो -- बाकीच्यांचे बघा -- बुद्ध,

तुकाराम, ज्ञानेश्वर यांच्याबद्दल असे कोणतेही निष्कर्ष काढण्याची माझी तरी कुवत नाही.

**१६ जून २०२१.**

मी सरांचा विद्यार्थी होतो. माझ्या लेखनाला मिळालेली पहिली जाणकार दाद त्यांचीच ! हे गाणे ऐकून आठवणी जाग्या झाल्या. उत्तम कविता, उत्तम गाणे ! ( प्रा. शंकर वैद्य – ‘ पहाटेची वेळ ‘ – कौशल इनामदार ).

आधी अनुभव क्षेत्रांची वर्गवारी करून त्या क्षेत्रांचे मूल्यमापन ठरवायचे आणि मग तेच कलाकृतीत कोणते अनुभव आहेत हे पाहात तिथेही लावत सुटायचे, असा प्रकार माजलेला आहे. या पोस्टमध्येही, मी निम्नस्तरीय बैठ्या चाळीत राहिल्यामुळे पुलंच्या साहित्याबद्दल ममत्व वाटले नाही, असे आहे. अनुभव कोणता आहे यावर साहित्य चांगले की

नाही हे ठरत नाही. ग्रामीण वा दलित वा विद्रोही म्हणजे चांगले, मध्यमवर्गीय म्हणजे वाईट या फारच ढोबळ कल्पना आहेत. मला स्वत:ला पुलंचे लेखन फारसे आवडत नाही, मी त्यांचे फारसे वाचलेलेही नाही ( फक्त बटाट्याची चाळ आणि अपूर्वाई ). लेखकाच्या मर्मदृष्टीत असते मूल्य, अनुभवात नव्हे.

ही कविता ' सत्यकथे ' त प्रसिद्ध झाली तेव्हाच ही ग्रेट कविता वाचायला मिळाल्याचा आनंद मी पत्र पाठवून राम पटवर्धनांना कळवला होता -- पुढे ' सत्यकथे ' तच आलेल्या माझ्या ' कवितेतील अभाव ' या लेखातही या कवितेबाबत लिहिले होते. रामचंद्र कदम इथे आपले फ्रेंड आहेत. त्यांना पुन्हा एकदा जाहीर विनंती -- पुन्हा चालू करा तुमचे कविता लेखन ! वरचा पत्कींचा लेख उत्तमच आहे ! ( ‘ सभासद ‘ – रामचंद्र वामन कदम )

मुंबईत ऑपेरा हाऊसजवळ होते कुणी --तेव्हा वर्तमानपत्रात भृगू संहिता अशीच जाहिरात होती -- मी गेलोच नव्हतो, माझे वडील गेले होते -- त्यामुळे माझा अंगठा घेण्याचा प्रश्नच नव्हता -- जे घडले त्याचा उल्लेख कवितेत आहे -- तो चुकीचा असेल तरी बिघडत नाही -- आशयात आणखी एक पीळ वाढेल -- याला नाडी म्हणावे की भृगू याने आशयात काही फरक पडत नाही --

रंगसूचना फारशा द्यायच्या नाहीत हे मी आपोआपच सुरुवातीपासून पाळत आलेलो आहे. आपोआप, जाणीवपूर्वक नव्हे. एकदाच मी हुशारी करून ' आता तपकिरी प्रकाश येतो -- ' असे लिहिले होते ( अगदीच नवखा होतो तेव्हा ) -- ते नेमके एका नामचीन दिग्दर्शकापुढे वाचले गेले ! त्यांनी मला विचारले की म्हणजे कसला हवाय प्रकाश ? तेव्हा तर माझ्या डोक्यात लख्खच प्रकाश पडला होता !

मिलिंद, तो बोर्ड दे सोडून -- तुला बहुतेक जाणीव नसावी -- ही एक अत्युत्तम न-कविता झालेली आहे ! न-कवितेचे हे एक अमर उदाहरण जन्माला आलेले आहे ! या निमित्ताने आता सुरुवातच कर -- भरपूर न-कविता लिही आणि मराठीतली, कवितेबद्दलच्या ठराविक कल्पनांची कोंडी फोडून टाक ! न-कवितांचा मराठीतला पहिला संग्रह तुझा येवो ही दिलसे सदिच्छा ! ( मिलिंद शिंत्रे )

तू हा विषय महत्त्वाचा मानून त्यावर इतके चिंतन व्यक्त करतो आहेस, हीच मुळात मराठीतली एक महत्त्वाची घटना आहे. मतमतांतरे होत राहतील. ( स्वप्नील चव्हाण )

ब्रेख्त हा एक परिवर्तनवादी नाटककार होता. पारंपरिक करमणुकीच्या नाटकात प्रेक्षक नाटकाशी आणि त्यातल्या पात्रांशी भावनिकतेने समरूप होत. त्यामुळे त्रयस्थपणे पात्रांच्या कोणत्याही समस्यांची समज येऊ शकत नाही, असे त्याला वाटत होते. त्यामुळे ती समरूपता तोडून टाकणारी -- पात्रे आणि प्रेक्षक यांत अंतर निर्माण करणारी अनेक तंत्रे त्याने वापरली. पुढे ती अनेकांनी वापरली. अनेक महत्त्वाचे लेखक व कवी हे म्हणतच आलेले आहेत की कलेत अनुभवाशी समरूप होणे हा आशय पोचण्यातला अडथळा आहे. कवी आणि काव्यात्म व्यक्ती यांत फरक सांगण्यात आलेला आहे. प्रतिक्रियारूप लेखन हे जगण्याचे भान देण्यात कमी पडते, असे अनेक लेखक, कवी म्हणून गेलेले आहेत. मराठीला त्याची कितपत गंधवार्ता आहे, हा प्रश्न आहे. आपण परभृत का असावे -- असा प्रश्न इथल्या अनेक मातीप्रेमींना पडू शकतो. पण, इथेही ' परतत्त्व ' सांगितले गेले, ' परी त्या विश्वंभरे बोलविले ' असे म्हटले गेले. त्या सगळ्यावर, आज आपले काय म्हणणे आहे ?

मी पाहिला होता हा प्रयोग -- तुझा अभिनय ही एक कमाल होती यातली ! मी बहुतेक इथे फेसबुकवर लिहिलेही होते. या उत्तम आठवणीबद्दल धन्यवाद ! ( गजब कहानी – गीतांजली कुलकर्णी )

असेही म्हटले गेलेले आहे की बोदलेयरने फ्रेंचमध्ये अनुसर्जित केलेला एडगर ऍलन पो हा मूळ इंग्रजीपेक्षा अधिक चांगला आहे.

तुम्ही एक निष्कर्ष मांडत आहात. त्याचा अर्थ कोणत्या ना कोणत्या कंडिशनिंगने च माणूस जगत असतो. कंडिशनिंग थोडेफार बदलले की मते बदलू शकतात. पण, कंडिशनिंग आणि त्यातून येणारी मते यांतून सुटका नसते. बुद्धाच्या ' निब्बाण ' चे जे समानार्थी शब्द दिले आहेत त्यात ' The unconditioned ' हा पहिला आहे. त्याचा शब्दश: अर्थ ' blow out ' म्हणजे कंडिशनिंग फेकून देणे असा आहे. यालाच तुकाराम ' अहो पंडितजन तुका टाकावा थुंकोन ' असे म्हणतो. ज्याला मतमतांतरे आणि ' माझे सत्य ' हे कुचकामी असल्याचे जाणवते त्याला बुद्ध आणि तुकाराम काय म्हणताहेत हे समजून घ्यायची तातडी वाटू शकते. त्यासाठी अर्थातच तो स्वत:ची मते आणि निष्कर्ष टाकून द्यायला तयार होऊ शकतो. काहींचा स्वत:च्या निष्कर्षांवर पक्का विश्वास असल्याने ते बुद्ध, तुकाराम यांना सत्वर नकारही देऊ शकतात. कंडिशनिंग आणि मते यांचे जगणे म्हणजे संघर्ष, हिंसा, विषमता, अन्याय, छळ, दु:ख यांचे जगणे, हे तर्कानेही कळू शकते.माझाच निष्कर्ष डोळस, असे प्रत्येकजण म्हणतो. आणि बुद्ध अवघड वा तसे जगणे अशक्य, असा निष्कर्ष घेऊन बुद्धाचे साधे ऐकता तरी येईल का ? समजून घ्यायचे असेल तर ओपन राहावे लागेल. कोणतेही निष्कर्ष -- व्यक्तिगत असोत की सार्वजनिक -- मुख्य मुद्दा कंडिशनिंगचा आहे -- त्यात सगळे मुद्दे अंतर्भूत आहेत -- यमनियमांची कोणतीही चर्चा फापटपसारा वाढवते. शेवटी हेही म्हणता येतेच की इतके महात्मे येऊन काय उपयोग झाला ? असे म्हणून जे आहे ते चालू द्या, हे सत्य त्यातून मिळू शकते !दोन्ही कंडिशनिंगच असते -- कंस-बिंस निरर्थक.
नाही मान्य पण ठीक --

खरोखरचे सवाल उभे करून आंदोलने उभे करणारेही असतातच -- समांतरपणे सर्जकतेचेही महत्त्व आहे -- सर्जकतेचे वातावरण वाढले तर कदाचित आंदोलनांची गरजही पडणार नाही. पण , कला ही आंदोलनांसाठीच फक्त वापरायला हवी, असे म्हणणारेही आहेतच ! शेवटी, आकलनाचे स्वातंत्र्य आहेच ना !
बरेच आणि गहन आहेत प्रश्न ! कुठे एवढा विचार करत बसा आणि त्यातून निघणार तरी काय -- छोड दो , जाने दो -- हाच योग्य संदेश आणि मार्ग दिसतोय !
Creativity and Brain असा सर्च द्या -- बरेच सापडेल.
तसेच creativity and health -- हेही बघा --
उदाहरणांत गुरफटून जावे की आपला आपण शोध घ्यावा हाच शेवटी महत्त्वाचा प्रश्न आहे. उदाहरणे ही अनेक प्रकारांची असणारच !

आपण फाटक्या, विदीर्ण मनांनी जगतो. ' एकविध मन ' हाच देव असे तुकाराम म्हणतो. ' ठायीच बैसोन करा एकचित्त ' हे तुकारामाचे लोक विसारतात. जे. कृष्णमूर्तीही integrity चे महत्त्व सांगतात. विभक्त, तुटक्या-फाटक्या मनाने तुम्ही जे जे कराल ते पापच असे हे म्हणतात. ज्ञानेश्वरीच्या नऊव्या अध्यायात ज्ञानेश्वर पुण्यात्मक पाप आणि पापात्मक पाप यावर बोलतात. विदीर्ण मनाने पूजाअर्चा, वारी वगैरे काहीही केले तरी ते पापच, असे हे म्हणणे असते. ' देव अंतरे ते पाप ' असे तुकाराम म्हणतात त्यातला देव म्हणजे एखादी मूर्ती नव्हे तर ' एकविध मन ' . डॉ. लागू हा विषय सोडूनच दे. ते नुसत्या पोकळ, हुशार घोषणा देत होते.
मी थोडक्यात सांगितले -- यापुढे ज्याचे त्याने घ्यावे समजून -- वाटल्यास –

हा स्वत:ला समजून घ्यायचा विषय आहे -- प्रत्येक माणसाची चिकित्सा करून त्यावर निकाल देण्याचा नाही -- तरीही, यात 'अधिकारी ' कुणालाच समजू नये -- मीही सगळ्या प्रश्नांची उत्तरे द्यायला स्वत:ला पात्र समजत नाही -- आणि एखादे ' पटणारे ' उत्तर म्हणजे निराकरण नसते, हेही पाहायला हवे --

हा ज्याचा त्याने विचार करायचा, समजून घ्यायचा विषय आहे -- काही पटवून द्यावे हा माझा हेतू नाही --

तो अभावितपणा हा अडथळा आहे संपर्कातला -- खरे तर पूर्ण जगण्यातलाच -- मी जगतो म्हणजे माझे मूड जगतो -- कुणी कुणाला भेटतच नाही -- कवीने खरे तर असे काही बोलूच नये -- वाचकाला विचार करू द्यावे -- त्यासाठीचे खाद्य कवितेतच असते.

व्यक्तिगत क्रिया-प्रतिक्रियांच्या जगण्यातून हिंसा घडते आणि दु:खनिर्मिती होते -- हा माणसाचा सार्वत्रिक आणि सार्वकालिक अनुभव आहे. यापलीकडे असू शकते का जगणे, या मूलभूत प्रश्नातून अनेक धर्मांची निर्मिती झाली. त्यांच्याही, पुढे अस्मिता होऊन तेही सगळे व्यक्तिगतच झाले -- हे पाहता, धर्माची ' समरूपता ' हे विष ठरते. पण जो मूलभूत प्रश्न आहे त्याबद्दल मार्क्स बाबा काही बोलतात का, ते सांगावे. समरूपता म्हणजे identify होणे. माझा धर्म म्हणजे मीच, माझी विचारसरणी म्हणजे मीच, माझी भाषा, माझे घराणे, माझा देश -- असे सगळे.
' दु:खमुक्ती शक्य आहे ' असे बुद्धाने सांगितले तर तुम्ही म्हणणार बुद्ध फसवणूक करत आहेत ! माणसाला काही प्रश्न मूलभूत महत्त्वाचे वाटतात आणि तुम्हाला समजा ती सगळी बकवास वाटते तर त्यावर जो तो बघेल कुठे जायचे ते !

Rajeev Madhav Joshi
चं प्र तुम्ही बँकर म्हणून जे काम केले आहे ते ही असे अधून मधून लिहा

Veena Sahasrabudhe
वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा 💐💐💐👋

Leena Pandhare

Hemant Kulkarni
आपल्याकडे बँकेचेही पुष्कळ किस्से असतीलच ना.कधीतरी एखादा खास शेअर करावा .तो खास व एकमेकाद्वितीय असावा.

संदीप धावडे दहिगांवकर

Shilpa Gadmade
वाढदिवसाच्या शुभेच्छा 🌼

Narhar Kulkarni

Sanjay Pise

Write a comment…

Swaroop Khopkar
चं प्र तुमच्या कवितांनी, लेखांनी,
नाटकांनी आमचं आयुष्य समृद्ध केलंय! हा झाला तीन चतुर्थांश भाग, पण उरलेल्या पाव भागानी आम्हाला आणखी श्रीमंत व्हायचय त्याचं काय?
खूप खूप शुभेच्छा आणि आदरपूवेक नमस्कार!🙏💐💐 - स्वरूप आणि अनिल खोपकर
Champra Deshpande
Swaroop Khopkar खूप धन्यवाद !

Umesh Deshpande
तुकारामावर प्रेम करणारे भरपूर आहेत पण वेड्यासारखे तुकारामाचे तत्वत्ज्ञान जाणून घेऊन त्यावर अभ्यास करणारे चंप्र इतके साहित्यीक आज घडीला किती आहेत?त्यांचा तुकारामावरील आवाका त्यांच्याच एका....तुका आकाशा एवढा या एका अभंगावरिल निरूपणावरून दिसून येतो.अक्षरशः असा अभ्यास कोणी केला असेल असे वाटत नाही.....
जगाने तुकोबाचे भरलेले ज्ञान गाईले....तर चंप्रंना तुकोबाचे रितेपण वेड लावून जाते आणि हेच वेड ते जगाला पण लागावे याच एका उद्देशाने ते आज इतकी वर्षे आपल्या कविता,लेख,नाटके यातून सतत मांडत राहिले.लोकांन असले रितेपण ,जिवनाचे कटूसत्य शोधण्याचे परीश्रम आणि डोक्याला ताप नको असतो.भरल्यापोटी जे साहित्य आपली करमणुक करेल,हसवेल किंवा कधीकधी माफक दु:ख देईल ते साहित्य अभिजात साहित्य अशी ज्यांनी साहित्याची व्याख्या केली असेल त्यांनी चंप्रंच्या साहित्याकडे न वळलेेलेच बरे!
अशा लोकांना कवितेत गेयता हवी असते.अनुप्रास हवा असतो आणि हेच लोक चंप्रंच्या कवितेत गेयता नाही अशी तक्रार करतात.अशा लोकांनी खरतर....असावा सुंदर चॉकलेटचा बंगला....अशी बालगीतच गावीत.अर्थात माझा अशा बालगीतांवर आक्षेप नाहीये.अशी बालगीते देखील मानवी जिवनात आवश्यकच आहेत.
गद्य कविता आणि पद्य कविता यावर खुप ऊहापोह होतोय.
माझ्या दृष्टीने कविता काय किंवा विचार काय हे भाषेच्या विविधतेवर किंवा भाषेच्या केवळ सौंदर्यावर अवलंबून नाहियेच मुळी.भाषेच्या गोड गोड लाडूंनी आजपर्यंत अनेक कवींनी लोकांना फसवल आहे किंवा हसवल आहे.ठीक आहे माफक करमणूक आहे ती!!!
पण जिवनाचा प्रचंड मोठा आवाका हा शब्द सौंदर्यात,अनुप्रासात,कधीच मावत नाहीत।
चंप्रंच्या कवितेत अशी गोड गोड शब्दांची खैरात नाही.उलट त्यांच्या दृष्टीने मानवी मन हे गधडे आहे.मनाच इतक समर्पक वर्णन कोणी केल नसेल.।
एकदा एका माणसाला रस्तावर एक कापडाचा तुकडा मिळतो. तो तो धोब्याला देतो .धोबी ते स्वच्छ धुतो.मग शिंपी त्याची टोपी बनवतो आणि गोंडेवाला तिला गोंडे लावून सजवतो....मग ती विदुषकी टोपी घालून तो माणूस लोकांचे मनोरंजन क रत रहातो...
निसर्गाने असेच हे आयुष्याचे कापड रस्त्यात टाकले आहे....अथांग सागरासारखी जिवनात समस्या भरली आहेत ,न सुटणारी कोडी पेरलेली आहेत आणि ही कोडी सोडवण्याचा प्रयत्न एखादा ज्ञानेश्वर करतोय,एखादा तुकाराम करतोय,एखादा सांत्र करतोय,ॲरिस्टोक्र्याट करतोय तसाच ओशो,जे कृष्णमुर्ती पण हेच शोधण्याचा प्रयत्न करत आहेत.।।।

जिवनाचे अंतिम सत्य कोणालाच नाही उमजले मग ह्या आध्यात्माचा उपयोग काय?असा ही सवाल उठू शकतो,पण हे अंतिम सत्य अजून उमगले नाही हीच तर जिवन जगण्यातली गंमत आहे.जिवनाचे अंतिम सत्य तर स्मशातच समजेल आणि ते समजून काहीच फायदा नाही कारण तिथे तर स्मशान शांतताच असते...
माझ्या नजरेत चंप्र या काळचे तुकाराम आहेत ,सात्र आहेत ते लौकिकार्थाने नाही तर त्या ज्ञानपिपासू वृत्तीने।।।
चांगली बँकेची नोकरी सोडून पुर्ण वेळ साहित्याला दिला आणि तोही अर्थार्जना साठी नाही.त्यांनी मनात आणले असते तर असंख्य व्यवसाईक नाटक लिहून रग्गड पैसा कमवला असता.महाराष्ट्राचे एक प्रथितयश व्यावसाईक नाटकका म्हणून लौकिक कमवला असता....नुसती रॉयल्टीच कित्तेक लाखात घेतली असती।।।
पण आपले सारे साहित्य एका क्लिक वर फुकट उपलब्ध करून देणारे आणि अनेक तरूण,होतकरू,प्रथितयश कलाकृरांना रॉयल्टी शिवाय आपले नाटक करू देणारे मराठीतील हे एकमेव नाटककार असतील।
असा
अत्यंत सच्चा माणूस,आपल्या विचारांशी अत्यंत प्रामाणिक माणूस सापडणे खुप कठीण आहे।।।
काका तुम्हाला तुमच्या 75 व्या वाढदिवसाच्या खुप खुप शुभेच्छा।💐💐

Hemant Kulkarni

Umesh Deshpande वाढदिवसाला असे लिहावेच लागते म्हणून नाही पण आहे ते सत्यच आहे.तुकाराम आवडण्यासारखेच आहेत पण खरा अभ्यास फारच कमी.चंप्रंना परत शुभेच्छा.

Nisarg Deshmukh

चं प्र ही रोज लाभणारी एक पर्वणी , देशातील मोजक्या वास्तववादी नाटककारा पैकी एक . मानवी स्वभावाचे नेमके आकलन . एकदा मी तुम्हाला मुद्दामच गमतीने .." तुम्हाला सायकॉलॉजी कळते म्हणून तुम्हाला एक विचारतो " असे बोललो . यावर तुमच्याकडून मला अपेक्षितच असलेले वाक्य ऐकू आले , " मला मन कळते , सायकॉलॉजी नाही " अर्थात ती गंमत होती हे मी आता reveal करतो . ... Dramatic sense असलेले पायलीला पन्नास नाटककार म्हणजे मालिका लेखक , कथा लेखक , स्पर्धा एकांकिका लेखक सापडतील . ज्यांची ' घटना रचण्यावर ' मास्टरी असते. पण तो नाटककारच काय , ज्याला मन कळत नाही . 99 % लेखकांची पात्रे ( ? ) त्या लेखकांच्याच व स्टोरीच्या तालावर चालतात . हे असलं खोटारडे नकली नाटक सदा सर्वदा सर्वांना बघावे लागत आहे अज्ञानी समाधानात . पण हा जगण्याचा खरा खेळ .. दाखवणारे चं प्र सारखे फारच कमी . त्यांचे नाटक एकीकडे निराशावादी वाटत असले , तरी एकीकडे हलके फुलके व तणावमुक्त असते . व मजेशीर जीवनाचा प्रत्यय देणारे असते
अव्याहत चिंतन यज्ञ . आणि अहंकार मुक्त माणूस . नाहीतर काही प्रायोगिक नाटककार ... एकदम वरच्या सिंहासनावर बसलेले असतात . ते त्यांच्या मोजक्याच लोकांशी बोलतात . हे असे फेसबुक सारख्या तुच्छ स्थळी ते पेज उघडणारच नाहीत . एकतर ही साहित्यिक कलावंतांची दीड शहाणी जमात असते . चं प्र मुळातच अपवाद आहेत , कारण अध्यात्मिक पाया आहे . त्यामुळे अहं ब्रम्हां हा गधडेपणा त्यांच्याकडे नाही . स्वभावदोष नाहीतच असे नाही . मतभेदही आहेत .
पण तरीही चं प्र ... एक भारी व भले माणूस .

Shriranjan Awate

चंप्र, वाढदिवसाच्या मनापासून सदिच्छा !

Navnath Prasad Kambli

Happy 75 th Birthday Champra sir 🎊□🎉♥□□💐

Neelima Deshpande

Ramesh Zawar
शुभेच्छा! भारतात एकंदर आयुर्मान वाढत चाललंय् ही आनंदाची गोष्ट आहे! अर्जुनाला गीता सांगत असताना अर्जून ६० वर्षांचा तर कृष्ण ८० वर्षांचा होता असं भारताचार्य चिंतामणराव वैद्यांनी सिध्द् केलंय् असं मी कुठंतरी वाचलं!
Yojana Bahalkar Bhave
सर , वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा 🎉💐🎂 येणारे हे नवे वर्ष निरामय आनंदी जावो ही प्रार्थना 😇🙏
Uday Narkar
चंप्र, लाखभर शुभेच्छा

Gauri Kantinath Sankhe
आज आपला वाढदिवस वाढणा-या प्रत्येक दिवसागणिक आपलं यश, आपलं ज्ञान आणि आपली किर्ती वृद्धिंगत होत जावो आणि सुख समृद्धीचा बहर आपल्या आयुष्यात नित्य येत राहो..
वाढ दिवसाच्या अगणित शुभेच्छा..
आयु आरोग्यदायी राहो आणि पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा..
गौरी संखे🎁🎂

Shalaka Wakankar
वयाला टिळा लागला नंबराचा
म्हणून का कोणी मोठा होतो?
असावी लागते बौद्धिक कुवत
तेव्हाच खरा कस लागतो!
विचारांची बैठक पक्की लागते
समजून घेण्याची वृत्ती लागते
कसे, का, प्रश्न पडले तरी
उत्तरं शोधण्याती कुवत येते
टीका करणं सोप्पं असतं
उणीवा दाखवणं कठीण नसतं
पण डोकावून स्वत:च्याच मनात
स्वत:ला समजणं अवघड असतं
शब्दांची दुनिया उभारत असता
अर्थ बरेच वेळा हरवतो
चांगलं दिसण्याच्या नादानध्ये
मीच माझ्यावर पडदा टाकतो
तुमचं मात्र बरं असतं
आतबाहेर एक असतं
भंपकपणा, लोचटपणा
यांना तुमच्याकडे स्थान नसतं!
निर्भिडपणा तुमच्या लेखी
सर्वात महत्वाचा असतो
शिवी मागे लपलेला

मोकळेपणा तुम्हला भावतो
स्वत:ला जाणून असलेलं भान
तुम्हाला जमिनीशी घट्ट धरतं
मनाच्या विस्तीर्ण फेऱ्यांमध्ये
माणूसकी जपत असतं!
— काका, खूप खूप शुभेच्छा पंच्याहत्तरीच्या!

Sachin Shinde
सरजी खूप खूप खुप सदिच्छा 🌷🌼🌷🌼🌷🌼🌷🌼💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

मधुकर धाकराव
हार्दिक सदिच्छांसह.. प्रिय चंप्र सर..
सुंदर!

Vishwas Kanekar
तुम्हाला दिलेल्या शुभेच्छा,
जे.कृष्णमूर्तींना दिल्या गेल्या बहुतेक...! तुमचा वाढदिवस उद्याचा इतिहास होईल.पण नातं जमा होतंच राहील..! जणू काही वास्तव अशा खर्या जगण्याच्या भानडीत बुध्दिबळ आणि झब्बू शिकवलंत..! पण तरीही गगनभेदि किंचाळ्या ऐकूच येतात...! वाढदिवसाचे ढोलताशे सर्रास वाजतात.पण तुमचे पथक मानाचे आहे...!
आता तर सगळेच कशात काय आणि फाटक्यात पाय झालेत...!
तुम्ही मात्र समतोलात जगलात, सलाम....!!

Rajesh Sonawane
पंच्याहत्तरीनिमित्ताने
केलेले हे
मनोगत म्हणा,… See More

Ashish Malshe
अनेकांचं जीवन, चिंतन अधिक समृद्ध, व्यापक करत जाणारे तुमचे शब्द शंभर वर्षे असेच अखंड स्त्रवत राहोत.
वाढदिवसाच्या आणि आरोग्यपूर्ण उदंड आयुष्य लाभो ह्या मनःपूर्वक शुभेच्छा. 💐💐

Neeta Madgulkar
अभीष्टचिंतन ~~ शरत् कुमार , नीता माडगूळकर .

Arvind Mule
फारच सम्यक उजळणी !
आभाळभर मनस्वी शुभेच्छा वाढदिवसाच्या !
देवल मास्तरांची साक्ष काढायची तर ----
" अवघे पाऊणशे वयमान ..."

पुढचा रोप्यमहोत्सवी आणि अधिकचा कालखंड अंतस्थ वकूबाने फुलारून येवो

Nirupama Shah
Many best wishes

Puja More
हे वाचलं आणि तीनचतुर्थांश आयुष्यातील तुमच्या स्वभावाचे अर्थ उलगडत गेले...... आणि काही अंशी आमच्यातही असलेल्या अहंकार आणि अपेक्षांना तडा जाऊ लागला आहे
खुपच प्रेरणादायी l
आदरणीय सर तुम्हाला जन्मदिनाच्या शुभेच्छा l

Sanjay Ranade
Only 25 needed more to score hundred

Altaaf Mulani
वाह एकदम नितळ... हार्दिक शुभेच्छा सर💐🎂@

Rupashree Vinit Kulkarni
Happy 75th Birthday Sir 😊🎊
Shrinivas Bhanage
७५ कोटी शुभेच्छा !

Suhas Baburao Choudhari
Happy Birthday...CHAM PRA
🎊🎊🎊🎉🎉🎉🎉
Vidyadhar Joshi
खूप खप शुभेच्छा!!!
Party करूया एकदा 😊
Shivaji Barve
Champra Deshpande आम्ही सांगून जमाना झाला. अजून योग जुळून येतोय.
तेव्हा ठिक आहे म्हणालात, आत्ता यांना जरूर म्हणालात. 😇
Most Relevant is selected, so some replies may have been filtered out.
Mrudula Deshpande
◦•●◉✿Happy birthday✿◉●•◦
Leena Pandhare
चिरतरुण कविवर्यांना सृजनशील प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा 🎂🎈🎉🎁🌹🎊

Omkar Shiralkar

Kavita Nanaware

खूप शुभेच्छा 🎊🎊

Ameya Gokhale
Happy Birthday !

Vilas Pagar
अनेकानेक शुभेच्छा!

Nisarg Deshmukh
वाढदिवसाच्या आरोग्यदायी शुभेच्छा 💐

Shivaji Gaikwad
GIF may contain Happy Birthday To You, हैप्पी, बर्थडे, जन्मदिन, की, शुभकामनाएं, केक, गुलाब, Happy Birthday, celebration and sharechat

Sushil Inamdar
शुभेच्छा सर 💐🎂

संदीप धावडे दहिगांवकर
ओ........हो........ अगदी.... !!
सराना वाढदिवसाच्या मनस्वी वावरभर शुभेच्छा 💐👋

Yamini Madhav Sapre
वाढदिवसाच्या शुभेच्छा सर🌹
Trupti Ar
वाढदिवसाच्या शुभेच्छा सर 💐

Bharat Daini
आरोग्यपूर्ण दीर्घायुष्यासाठी मन :पुर्वक शुभेच्छा सर💯💐🎊

Sharmila Bhatt
७५ ❤️
वाढदिवसाच्या आणि पुढिल आरोग्यमय वाटचालीसाठी अनंत शुभेच्छा!!

Irshad Bagwan
खूप शुभेच्छा सर.

मनीषा कुलकर्णी
Happy Birthday ❤️

Sagar Ranade

Mukund Tanksale
छान. शुभेच्छा

Jayesh Apte
Happy Birthday Sir

Yogesh Padmakar Vaidya
चंप्रकाका..जीवेत शरदः शतम्
Satish Desai

Minakshi Patil
आदरणीय सर , खूप खूप हार्दिक शुभेच्छा !

Smita Thorat
सुरेख लिहिलंत. प्रांजळ कबुली. मनःपूर्वक शुभेच्छा. ☺🌹

Rajendra Patil
वाढदिवसाच्या मनपुर्वक शुभेच्छा !!
💐💐💐💐💐💐💐💐💐

Suresh Karale
शुभेच्छा

Vasant Damale
चक्क निदान बहुतेक सर्व कळणारे लिहिले जात आहे म्हणून असे आणखी अनेक वाढदिवस आपल्याला साजरे करता येवोत. शुभेच्छा!

Shivaji Gaikwad
Manoj Gangal
Happy Birthday Sir! 💐💐💐

Vaishali Rama Wadhe
Hallmark Ecards Art GIF by Hallmark Gold Crown

Chandrashekhar Joshi

Vishakha Samir Mashankar

जिवेत शरद: शतम 💐
Kumar Badgujar

Siyaram Gupta
Happy birthday
Shridhar Tilve
Uttam

Sameer S. Dalvi
अमृत महोत्सवी शुभेच्छा चंद्र !

Sanjay Patil
अनंत शुभेच्छा

Chandrashekhar Dhandarphale

Dheeraj SN Pol

Vinod Rathod
वाढदिवसाच्या मनापासून शुभेच्छा... !!!

Rajesh Londhe
वाढदिवसाच्या शुभेच्छा सर ..

Vishwas Madhukar Deshpande
👌

Prashant Anaspure
हार्दिक शुभेच्छा...🎊

Vithal Sawant
शुभेच्छा सर.

स्वाती ठकार
वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा. 🌹

Kl Guglani

Shivaji Barve
💐🎈🎂▯❤▯

Bhatulal Bagul
आदरणीय सर, खूप शुभेच्छा 🎄❤️🙏

Pradeep Pradhan
अवघे पाऊणशे वयमान !

Satish Kurkure
🌹🌹🌹🌹🌹
जीवेत शरद: शतं !!!
पश्येत शरद: शतं !!!
भद्रेत शरद: शतं !!!
अभिष्टचिंतनम !!!
जन्मादिवसस्य शुभाशय: !!!
*जन्मदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा ।*
☺🙏
💞🌹🌷🌸💮🌸💐💞
💃🎊🕺💃🎊🕺💃🎊🕺👍

Sulbha Sawmitra
सर , वाढदिवसाच्या खूप साऱ्या शुभेच्छा .. 🌹

Pratibha Tembe
वाढदिवसानिमित्त उत्तम आरोग्य लाभो, ही सदिच्छा !

Priya Katke

Sukhada Korde
वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा काका! 💐

Satish Indapurkar
Happy Birthday Sir

Sanjivani Ghalsasi
वाढदिवसाच्या शुभेच्छा सर!!!

सु.मा. कुळकर्णी
अप्रतिम 💐

Dileep Shirgaokar

वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक अभीष्टचिंतन 🌹

Kavita Kshirsagar
Abhijeet Warang
Happy Bday sir

Dipak Kambli
खूप शुभेच्छा सर 🎂

Chandrashekhar Paranjape
शुभेच्छा शतायुषी होण्यासाठी

Pravin Sidhaye
Hbd Hon Champra
Adv Atul Sonak

Ninaad Ajgaonkar
वाढदिवसाच्या अनेकोत्तम शुभेच्छा 💐 💐

Madhukar Madane
Happy Birthday...........

Sagar Talashikar
मनःपूर्वक शुभेच्छा सर 🌹🙏

Chandrashekhar Paranjape

डॉ श्यामल बबन सराडकर
शुभेच्छा...

G Ovind Kasle
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा 🌹🌹

Anil Nalawade
Happy Birthday sir

Sureshkumar Vairalkar
May be an image of 1 person and text

Bhaskar Keer
May be an image of text that says 'आयुष्याच्या या पायरीवर तुमच्या नव्या जगातील नव्या स्वप्नांना बहर येऊ दे... तुमच्या इच्छा तुमच्या आकांक्षा उंच उंच भरारी घेऊ दे मनात आमच्या एकच इच्छा आपणास उद्दंड आयुष्य लाभू दे... वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा reation.com'

Ganesh Krishnamurthi
Happy birthday

Jugalkishor Oza
अमृत महोत्सवात पदार्पण हार्दिक अभिनंदन
व पुढील वाटचालीस शुभेच्छा...🎂💐🎊

Rohit Joshi
जन्मदिवसाच्या अनेक अनेक शुभेच्छा सर!!! आपल्याला उत्तम आयुरारोग्य लाभो ☺

Shashikant Adhav
सर वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा 🌹🌹

Balasaheb Raje

KB Rohan Shinde
जन्मदिनाच्या शुभेच्छा चंप्र सर💐🎂🎉

Hemant Kolhapure
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

Omkar Shinde
वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा सर..!!

Abhay Dhumal
Sir

Raviprakash Karambalikar
सर,
खूप खूप शुभेच्छा!!

Sukumar Patil
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

ऐश्वर्य पाटेकर
वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा सर..!!

Shailesh Phanasgaonkar
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा सर🎂💐🍫🎊🎁🍧

Sawan Dharmpuriwar
सविनय नमस्कार आणि शुभेच्छा!

Prakash Ranaware
प्रिय सर,
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

N Sumedha
पंच्याहत्तरीच्या हार्दिक शुभेच्छा!

प्रसाद रजनी विनोद पाठक
वाढदिवसाच्या आयुरारोग्यपूर्ण शुभेच्छा आणि नमस्कार
------------

हल्ली तुमची चित्रे पूर्वीपेक्षा ' उजळ ' येताहेत आणि रंगवैविध्यही वाढलेले आहे. ही चित्रे जास्त वेळ पाहिली जात आहेत. याचे नेमके कारण कळलेले नाही. तुम्ही शब्दांतून मांडलेली प्रक्रियाही ही चित्रे समजून घ्यायला उपकारक ठरू शकेल. ( जयंत बी जोशी यांच्या पोस्टवर ).

मला चालेल तुम्ही म्हणता तसे पण साहित्यात असे विभागवार बोलायची फार जुनी पद्धत आहे. या प्रकाराला नाव काय मग ? ' खोटे गद्य ' म्हणू -- पण काहीतरी म्हणावे लागेलच ना -- कादंबरी, कथा असे तर काही म्हणता नाही येणार !
अर्थात मला चालेलच ! गोंधळ कमी करायला जरा हातभार लावतोय, इतकेच ! काही कलावंत निर्मिती करून गप्प बसतात, काही निर्मितीबद्दल, प्रक्रियेबद्दल जमेल ते बोलतातही -- मी दुसऱ्या प्रकारचा आहे. सर्वांनी पहिल्याच प्रकारात असले पाहिजे, असे नाही.

तुम्हाला जे उमगत नाही ना त्याच प्रश्नावर माझे सगळे लेखन आहे ! माणूस सतत स्वतःच्या स्वभावाच्या, मतांच्या तुरुंगात का जगतो -- हा तो प्रश्न !

Kaushal S Inamdar
Champra Deshpande चंप्र, मनापासून आभार. माझ्या बोलण्यात आणि विचारप्रक्रियेत तुमचा, तुमच्या नाटकांचा फार मोठा सहभाग आहे हे आवर्जून सांगतो. खूप संस्कारक्षम वयात तुमच्या नाटकांचे संस्कार झाले.

एकाच प्रतलावर विचार करण्यापलीकडे जाऊन थोडं खरवडून आत काही मिळतंय का ते पाहण्याचं भान आलं. त्यामुळे तुमच्याकडून दाद मिळणं हे मला फार मोलाचं वाटतं.

Champra Deshpande

Kaushal S Inamdar या निमित्ताने बऱ्याच वर्षांनी आपला संपर्क झाला -- आनंद वाटला !

वा, खूपच महत्त्वाचा मुद्दा ! ' नंतर कविता दुरुस्त करू नये ' अशा अर्थाचे आंद्रे ब्रेटनही म्हणून गेला आहे !

न्याय दर्शवणारे कृपया तुम्ही काही लिहा ना ! तुम्हाला सगळे खरे प्रश्न आणि त्यांची खरी उत्तरे माहीत आहेत तर त्याचा लाभ तुम्ही मानवजातीला दिला पाहिजे ! मी जे लिहितो ते मला -- माझ्या बुद्धीला काही समजत नाही या बिंदूपासून लिहितो ! इथे स्वर्ग आणण्याच्या आयडिया तुमच्याकडे असूनही तुम्ही नुसतेच कुठेतरी त्रुटी शोधत बसता, हे बरे नाही ! तुमच्या ज्ञानाचा मानवजातीला लाभ द्यायला तुम्ही सत्वर सुरुवात करावी, ही विनंती !

तुम्ही मोठमोठे सात्त्विक माणुसकीचे उतारे लिहिता पण एक बारीकसा प्रश्न विचारला तरी पळून जाता, असे कृपया करू नये. चर्चेत भाग घेणार असाल तर तुमचे ज्ञान समजून घेण्याची संधी तुम्ही आम्हाला दिलीच पाहिजे, असे वाटते.

मुळात कविता म्हणजे व्यवस्था बदलण्याचे शस्त्र वा प्रबोधनाचे अस्त्र या कल्पना सोडायला हव्यात. कवितेने एखादा ' न्यायाचा ' वैचारिक साचा दिला पाहिजे अशा काहींच्या अपेक्षा असू शकतात. फक्त त्याच कारणासाठी कविता लिहिली पाहिजे, अशी सक्ती नसावी, म्हणजे झाले.

धन्यवाद ! फिर तो चलते रहेंगे !

मला शक्य तो, उपलब्ध उपाय योजना वापरायला योग्य वाटत नाही -- दोनचार वेळा तुम्ही म्हणता असे घडले तेव्हा मी आधी असे न करण्याची विनंती केली -- तरीही तेच चालू राहिल्यावर ब्लॉक करून टाकले.

Prakash Bal Joshi

एका वेगळ्याच विषयावरचे विशेष व्याख्यान ! यासाठी निवडलेली चित्रेही खास आहेत !

01 May 2021.

धर्मद्वेष, जातिद्वेष यालाही काही लोक वैचारिक समजू लागले आहेत ! आणि नापसंती, दोषदिग्दर्शन हे सगळ्यांचेच ' निवडक ' होतेय, ते कशामुळे ? आपण फार सज्जन, सोवळे , विचारस्वातंत्र्यवाले आहोत, असे सगळ्यांनाच वाटतेय !

Subtitles ला मराठी शब्द ' उपसंवाद ' चालतोय का बघा –

बाजू घेणे आणि सर्जकता यांचा संबंध कृपया जरा स्पष्ट करावा.

खरे तर मेलडी हाच शब्द आता मराठी समजावा. नेमाड्यांचा त्याच नावाचा एक कवितासंग्रहच आहे ना ! तरीही नवा शब्द म्हणून, ' मधुमेळ ' हा शब्द सुचतोय.

मला तर त्यांची मैत्रीच लाभली होती. एकमेकांना ग्रेट आणि मूर्ख, काहीही म्हणावे अशी ! माझ्या कविता ' नाट्यमय ' असतात असे प्रमाणपत्र ( तोंडी ) मला त्यांच्याकडून मिळाले होते ! ' प्रतिभावान ' या शब्दाला काही अर्थ असेल तर तो साकार करणारा मराठीतला महान साहित्यिक ! ( आरती प्रभू ).

लेखक फक्त त्याच्या मनाचे ग्रह मांडू शकतो अशा भूमिकेतून आलेले तुमचे हे विचार आहेत. ही कविता वेगळे काही म्हणतेय.
जे कंडिशनिंगमधून येत नाही त्याच्या ' शास्त्रीय ' अभ्यासाचा आग्रह धरून काय उपयोग ? सर्जकताही सवयीचा भागच असायला हवी, असे हे म्हणणे आहे !

मराठी समीक्षेच्या सध्याच्या वैराण वाळवंटात अत्युच्च ठरावी अशी ही आस्वादक समीक्षा आहे ! स्वप्नीलने समीक्षेच्या क्षेत्रातही काम करावे हे या निमित्ताने सुचवावेसे वाटते ! ( स्वप्नील चव्हाण ).

प्रत्येक चित्र परिपूर्ण आहे. एकमेकांत गुंतलेल्या अनेक आकारांचा तो एकेक समुच्चय आहे. असले तर सगळे एकत्र नाही तर काहीच नाही. या सर्व आकारांत एक समन्वय आहे -- संघर्ष नाही -- त्यामुळे, ही चित्रे मानवी जगण्यातल्या मौलिकतेचा प्रत्यय देतात, असे म्हणता येते. यांचा बौद्धिक अर्थ लावण्याचा आटापिटा न करता बघत राहावे, अशी ही चित्रे आहेत. या कलेत पूर्वनियोजितता असूच नाही शकत. त्यामुळे, हे एक उत्स्फूर्ततेचेही दर्शन ठरते.
( रमेश औंधकर ).

स्वत:च्या आवडीनिवडी, स्वभाव आणि व्यक्तिमत्व एकूणच फिक्स करत जाणारे लोक मनाने हळूहळू रिजिड -- ताठर होत जातात, जगण्यातली संवेदनशीलता घालवून बसतात आणि एका दु:खाच्या तुरुंगात जन्मठेप भोगत राहतात !

नजर खिळवून ठेवणारी वेगळीच चित्रकला -- गुंतागुंत असूनही ' पूर्ण ' पाहिल्यामुळे जणू विसावा देणारी --
( रमेश औंधकर ).

जाहीरनाम्यांचा तौलनिक अभ्यास करून कोण करणार मतदान ? आणि जाहीरनामेही भुलवणारे असणारच ना !

काही घडत जाण्याच्या प्रक्रियेचा असा समग्र आवाका घेणाऱ्या कविता आहेत किती मराठीत ? पण हा बाजारबुणग्यांचा, गटातटांचा, मतामतांचा, क्षुद्र मनांचा प्रांत होऊन बसलेला आहे. ही अशी एकच कविताही सगळा क्षुद्रपणा जाळून टाकू शकते. पण भांडणे, वादावादी म्हणजेच जगणे असे पक्के ठरवलेले लोक ही कविता वाचतील तरी कशाला ? मला तरी ही मराठीतली एक अपवादात्मक भान देणारी महत्त्वाची कविता वाटते. कलेची प्रक्रिया ही जिवंत परिपक्वता निर्माण करणारी असते पण त्या प्रक्रियेचा आपल्याला स्पर्शही होता कामा नये अशा निर्धारी अवस्थेतला रक्तमश्गुल समाज त्या प्रक्रियेलाच ' आय हेट यू ' असे म्हणत राहतो. ( श्रीधर तिळवे ).

विनायकने, तो कॉलेज विद्यार्थी असताना, माझी ' इतिहास ' ही एकांकिका उन्मेष स्पर्धेत सादर केली आणि तिला प्रेक्षकांचे प्रथम पारितोषिक मिळाले ! अशा प्रकारे पहिल्याच फटक्यात विनायकने मला लेखक म्हणून मान्यताच मिळवून दिली ! विनायकच्या ' भरतशास्त्र ' आणि ' करू टवाळकी ' या दोन्ही अंकांत मी अनेकदा लिहिले होते.
( विनायक पडवळ ).

Champra Deshpande

आशा भोसले या पोस्ट□✿साठी तुम्हाला अत्यंत प्रेमपूर्वक अत्यादरयुक्त दिलखुलास प्रणाम !
Hemant Karnik
Champra Deshpande
एवढं नको हो!

डॉक्टरीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणकाळात वेड्यांचे इस्पितळ दाखवणे हा एक कार्यक्रम असतो. तसे काही विद्यार्थी तिकडे गेले होते. काही वेडे तिथे बागकाम करत होते. त्यांतला एक वेडा एक गुलाबाचे फूल घेऊन एका विद्यार्थ्याकडे आला आणि त्याला ते स्मितपूर्वक देऊ लागला. तो विद्यार्थी जरा बिचकला -- ' नको नको ' म्हणू लागला. यावर तो वेडा मोठ्या आवाजात दरडावून म्हणाला, " घ्या -- " यावर कुणितरी त्या विद्यार्थ्याला म्हणाले की अरे, घे, घे, तो प्रेमाने देतोय ! कळला ना सारांश ?
--- 000 ---

उत्तम कविता ! मी तीन वर्षे कोल्हापुरात होतो. आम्हा मित्रांच्या लेखन-वाचन-गप्पांच्या प्रत्येक बैठकीत दिलीपला त्याचा ' गोंधळ ' गायला लावायचे हे ठरलेलेच असे ! उत्तम मित्र, उत्तम कवी -- भाषेवर खास हुकमत ! ( दिलीप कुलकर्णी ). – 23 मार्च' 21.

प्रकाश, सावल्या, रंग आणि परिमाणे ! पाहातच राहावे, असे ! ( जयंत बी जोशी ).

तुम्ही म्हणता ते खरे आहे. राजकीय भूमिकेच्या आग्रहामुळे ध्रुवीकरण झालेले आहे. राजकारण म्हणजेच जगणे अशा निम्न अवस्थेला सर्वच क्षेत्रे आलेली आहेत. तरीही, त्या तसल्या धारणांना आपल्यात थारा न देता आपण राहू शकतो की नाही हे पाहणे महत्त्वाचे आहे. अन्यथा सगळीकडे हेच आहे. त्यामुळे, पुनर्विचार करून आपले निर्विष कार्य तुम्ही चालू ठेवायलाही हरकत नाही, असे वाटते. मीही ते ध्रुवीकरण फेटाळूनच इथे फेसबुकवर वावरतो. पण, तुमची इच्छा ! कला, समीक्षा या क्षेत्रातले तुमचे कार्य चालू राहावे, हीच सदिच्छा ! ( गणेश कनाटे ).

सगळ्यांनाच त्रास होतो, असे नाही -- यावर सध्या समाधानी आहे !शिवाय काय आहे -- मराठी लेखक, कवी निढावलेले असतात -- शून्य मानधन, किरकोळ प्रसिद्धी, कुणी न वाचणे, न पाहणे, अनुल्लेखात नेहमी मारले जाणे, अशा अनेक गोष्टी ते सहन करत असतात -- हे व्हायरसबीयरस त्यापुढे काही नाही ! ( लस या विषयावर ).

मी माझ्यापुरती आणि सध्याची कवितेची व्याख्या अशी करतो --
' शब्द आणि वाक्ये वा ओळी यांच्या साहचर्यातून, क्रमवारीतून व आंतरसंबंधांतून व्यक्त होणारी संसूचक अर्थवलये एका परिपूर्ण आशयाप्रत पोचवणारा एकसंध भाषिक मजकूर म्हणजे कविता. ' इथे अलंकारिकता, वृत्तबद्धता, सांगीतिक लय, भावनिकता, स्वप्नीलपणा – अशा गोष्टींना महत्त्व दिलेले नाही, हे लक्षात घ्यावे. अलिकडची आणि आजची जागतिक कविता या अशा गोष्टींना कवितेची व्यवच्छेदक लक्षणे मानत नाही.
कोणत्याही कलेत व्यक्तिगत आणि सामाजिक असे द्वंद्व अस्तित्वात नसते. ' सामाजिक ' चा वेगळा विचार ही एक निरर्थक बाब आहे.
फक्त कवितेतच आहे असे कवितेचे व्यवच्छेदक लक्षण असू शकत नाही. कवितेचे महत्त्वाचे लक्षण सतीश तांबे, राजन खान, लाखे वा काफ्का यांच्या कथात्म साहित्यातही असू शकते. शेवटी एखादा मजकूर तारतम्यानेच कविता ठरतो. एखादा मजकूर गद्य वाटतो पण एखाद्याच ओळीने त्याची परिमाणे बदलून ती कविता होते. कविता आणि गद्य हा

भेदच खोटा आहे -- तो मजकूर कविता म्हणून अर्थवलये देतोय की नाही, एवढेच पाहता येईल. तरीही मतभेद संभवतीलच.

आशयाची लय ही संगीताची लय असेलच असे नाही, इकडे लक्ष द्या म्हणजे झाले !

आम्हाला हिंदी शिकवायला एक शिक्षक होते. त्यांची शिकवायची पद्धत फार भारी आणि सोपी होती. समजा, शिकवत असलेल्या धड्यात असे एक वाक्य आले, " मुझे लगा की अब मुझे कलकत्ता जाना पडेगा I " की ते शिकवत, लेखक कहता है की उसे लगा की तब उसे कलकत्ता जाना पडेगा I -- या पद्धतीने प्रत्येक वाक्याच्या आधी, लेखक कहता है, असे जोडत गेले की तो धडा शिकवून होई ! -- या पद्धतीने जर कविता ' कळत ' असेल तर ती कविताच नव्हे. काही वेळी एखादे वाक्यच असते पण ते वेगळेच काही सांगत असते. मजकूराच्या रचनेत आणि दिसण्यात कविता शोधू नये. एखाद्याला लयबाजीची इतकी सवय असते की तिच्याशिवाय तो कवितेची कल्पनाच नाही करू शकत. चॉसर समजा म्हणाला की तिचे कपाळ सुंदर होते तर त्याला ते नसतेच सांगायचे -- कपाळ उघडे टाकणे हे निषिद्ध असून तिने ते उघडे टाकलेय, हे असे त्यात. समोर दिसणारा मजकूर म्हणजे कविता नव्हे. त्या मजकूरातला क्रम, कशानंतर काय कसे येते, त्यांतले आंतरसंबंध -- असे सगळे विचारात घेतले तर त्या मजकूराच्या दृश्य रूपाच्या बाहेरच असते कविता. काही वेळी वाचकाने बंदिस्त राहिल्यामुळे ती कविता त्याच्या मनात पूर्ण पोचत नाही, मग त्याला फक्त दृश्य मजकूरच पोचतो. जर कविता ' मजकूरबाह्य ' अंगांनी खूप व्यक्त होत असेल तर तो मजकूर गाता येत नाही म्हणून वाचकाने रुसून बसू नये. कवितेच्या रचनेतल्या आणि दृश्य रूपातल्या ढोबळ सवयी आणि अपेक्षा एकूण जगानेच कधीच सोडून दिलेल्या आहेत. एकदा समोरचा मजकूर ' एकूण ' रूपात मजकूरबाह्य असेही खूप काही सांगत असेल तर ती कविताच असते. जगात खूप कविता सरळ उताऱ्यांतूनही लिहिल्या गेलेल्या आहेत. एकदा का त्या मजकूराचे असे ' कवितापण ' कळले की तेच ' गद्य निवेदन ' म्हणून सांगता येईल का, हा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. आता गद्य की कविता अशी सीमारेषा आखत बसू नये. खुले राहणेच महत्त्वाचे आहे. यावरून हे लक्षात येईल की एकच कविता एकाला गद्य आणि दुसऱ्याला कविता असू शकते

' मानवी मूल्यांनी युक्त असणे ' हे कलाकृतीचे महत्त्वाचे लक्षण मानावे, ज्याचीत्याची घरगुती, व्यक्तिगत विचारसरणी नको. असे काही नसतेच वा असे काही कुणाला समजूच नाही शकत, असे मानणे हा निराशावाद तर आहेच पण शिवाय chaos -- गोंधळ -- अराजक मान्य करणे आहे.

सर्वांचे आभार. सर्व विचारात घेऊन ' सांभार ' फायनल केले.

मीही माझ्या ५० व्या वर्षी स्वेच्छानिवृत्ती घेतली. कलेच्या क्षेत्रात खात्री कुठे असते कसलीही ? धोका होताच. आर्थिक नुकसान होणार होतेच. पण, चलेगा, हेच ठरवले !

मतांच्या क्षेत्रात एकमेकांना न जुमानणारे असणारच -- म्हणूनच तर सहिष्णुतेच्या गप्पा मारायच्या !

नेमाड्यांची फालतू शेरेबाजी खपवून आणि आवडून घेणाऱ्या मराठीत चालतेय हो एवढे !
मी माझे फक्त सांगू शकतो -- मी द्वेषबीष नाही करत -- माझी कुणाशीही स्पर्धा नाही -- मला लिहायचे ते मी लिहितो आणि माझ्या संकेतस्थळावर टाकून विषय संपवतो. लेखकाने प्रसिद्धी आणि बक्षिसे मिळवणे हे मला साहित्याचे महत्त्वाचे काम वाटत नाही. सांस्कृतिक प्रक्रियांना जिथे मोठे अडथळे दिसतात ते फक्त मी माझ्या परीने दाखवून देतो. आपण कुणाला विरुद्ध वाटणारे लिहिले-बोलले की तो द्वेष होतो ही तुमची थियरी नेमाड्यांना लावून बघा. याउपर

तुम्हाला जे संशोधन करावेसे वाटते ते तुम्ही जरूर करावेच. फक्त ते कुणाच्याही विरोधात काहीही न बोलता करून दाखवा म्हणजे झाले !

मी वाचलेले सगळे कवी आणि मी असे मिळूनच आम्ही माझी म्हटली जाणारी कविता लिहितो !

ही घ्या ती कविता --
दिवे ---- अरुण कोलटकर
काहीतरी कुजल्याचा वास याय लागला
अन मी खिशातनं रुमाल काढणार
तोच माझी करंगळी खाली पडली
ती मी दुसऱ्या हातानं उचलून घेतली
अन रुमाल नाकावर धरणार
तर नाकच निसटून रुमालात आलं
ते रुमालात गुंडाळून मी खिशात टाकलं
काहीतरी कुजल्याचा वास येतच होता
म्हणून खिशातल्या खिशात नाक मुरडलं
अन करंगळीत आळ्या पडल्यात की काय
ते बघणार : पण तेवढ्यात दिवे गेले
--- ००० ---

गूढवेडा तर मीही आहे -- सुमारे ८-१० वर्षे मी हस्तरेषांचा अभ्यास केला होता !
त्याचा कवितासंग्रह असा मी वाचला नाही पण त्याची ' चरसी ' कादंबरी त्याने मला दिली होती –

तुमच्याकडूनच काही स्पष्टीकरण येऊ शकते, हे मनात ठेवूनच तशी जरा रस्ता सोडून कॉमेंट दिली होती. या सविस्तर विवेचनाबद्दल मन:पूर्वक आभार. मुळात ' निर्वाण ' ही काही एखादी वैचारिक संकल्पना नव्हे किंवा अकादेमिक चर्चेचीही बाब नव्हे, याची मला जाणीव आहे. तरीही, मी मागे मे पुं रेग्यांची भाषणे ऐकली होती त्यांत आंबेडकरांच्या बौद्ध धर्मात ' निर्वाण ' नाही, असे आले होते. निर्वाण म्हणजेच दु:खमुक्तीच नसेल तर मग धर्म कसला, असा मला प्रश्न पडतो. तुमच्या या विवेचनात, आंबेडकरांनी निर्वाण मान्य केल्याचे आले आहे. आता मी माझ्या आठवणीतली ( कदाचित चुकीच्या ) ती भाषणे रद्द करतो. मी हे थोडेफार शोधायचा प्रयत्न केला होता पण समाधान झाले नव्हते. शिवाय, शेवटी, असेल नाही तर नसेल, अशी मनाची समजूत स्वीकारून टाकली होती. या एकूण पार्श्वभूमीवर, पुन्हा एकदा धन्यवाद !

Sagar Talashikar
तू कुठले ना कुठले माझे नाटक करावेस अशी इच्छा आहेच !

अर्थपूर्ण कवितेचेच विडंबन होऊ शकते -- निरर्थक कवितेचे नाही -- आहे खरा हा पेच ! 😁

जीएंना मोठ्यांचा चांदोबा

आणि
सावित्री ही छापून छापून वाढवलेली कादंबरी
असं म्हणणा-याला सहन करता आणि
वर गप्प बसता ?
वरील दोन्ही विधाने म्हणजे कडेकडेने बोलून पळून जाण्याचा प्रकार आहे. आशयनिष्ठ समीक्षेची कुवत नसल्याने हा मार्ग चोखाळला गेलेला आहे.

कर्नाटकात विजापूरला आम्ही आजरेकर चाळीत राहायचो. आम्ही मुले एखाद्या कार्यक्रमासाठी वर्गणी मागायला आजरेकरांकडे जायचो. अत्यंत मुरब्बी म्हातारा ! ते म्हणायचे, " तुमच्यापैकी कुणीही श ष आणि स यांचे योग्य उच्चार करून दाखवा आणि वर्गणी घेऊन जा ! " ( त्या वेळी विद्याधर पुंडलीकही तिथेच राहात असत ! )

प्रकाश बुद्धिसागर हा एक ग्रेटच दिग्दर्शक आहे ! नाट्यलेखक म्हणून मला प्रेक्षकांसमोर आणण्याचे सुरुवातीचे मुख्य काम प्रकाशचेच ! नंतर तो फार्सिकल नाटकांचा किंग दिग्दर्शक झाला ! प्रकाशने सादर केलेल्या माझ्या नाट्यकृती -- नातं, दिनकर पुरोहितचा खून, पोत्यातून गोत्यात, उत्सव, संसाराणूपेंडघार. माझे एक नाटक तो व्यावसायिकवर सादर करणार होता, त्याचे त्यानेच दिलेले नाव होते -- ' सांगून सुपरहिट ' ! ते काही घडले नाही. माझे एक नाटक त्याच्या दिग्दर्शनाखाली पणाशीकरांच्या ' नाट्यसंपदा ' ने स्वीकारले होते, त्याचे नाव होते, ' भीती चांदण्याची '. त्याची जाहिरातही आली होती पण तेही घडले नाही. पुढे तेच नाटक मोहन वाघांच्या ' चंद्रलेखा ' तर्फेही जाहीर झाले होते, ' प्रतिकार ' या नावाने. तेही घडले नाही. प्रकाशच्या त्या हेरिटेज बाईकवर मी त्याच्याबरोबर मुंबईत खूप फिरलो होतो. त्यातली खास सफर म्हणजे, प्रकाश, मी आणि मंगेश कुलकर्णी यांनी ट्रिपल सीट दादर ते चेंबूर जाणे !

त्याच्यासाठी कविता वा कला म्हणजे स्वनिर्मित मानसिक सवयींतून मुक्त असलेला सारांशहीन मजकूर आहे. -- ग्रेट ! गिरीश, हा तुझा लेखही एक अत्युत्तम कविताच म्हणावी इतका सखोल झालेला आहे ! चिंतनात्मक समीक्षा म्हणजे काय याचा हा एक उत्तम नमूना आहे ! ( रवी लाखे यांच्या अनुष्टुभ मधल्या 17 कविता ).

हॅरॉल्ड पिंटरच्या ' द लव्हर ' चे मराठी रूपांतर ' दिलवर ' या नावाने प्रकाश बुद्धिसागरने सादर केले होते. स्वराच्या आधी असेल तेव्हा दि आणि व्यंजनाच्या आधी असेल तेव्हा द असा नियम आहे.

६३ ते ६६ या काळात तर खानोलकरांना मी वारंवार भेटत होतो -- हे एका कॉमेंटमध्ये दिलेलेच आहे -- त्यावर आधारित बोलायचे तर अवचटांनी दिलेले तपशील चुकीचे आहेत. त्याच्या आधी अवचट अर्थातच १३ वयाहून कमी होते !

मी तो लेख वाचलेला नाही पण अवचटांनी असे का लिहिले असावे हे कळेनासे झाले आहे. मी स्वत: ५६ ते ६७ या काळात मालाडमध्येच राहात होतो. खानोलकरांशी माझी मैत्रीच होती. सुमारे ६३ ते ६६ या काळात आमची महिन्यातून किमान तीनदा तरी भेट होत असे. त्या काळातल्या खानोलकरांच्या बऱ्याच लेखनाचा पहिला श्रोता मी असायचो -- आमचे वादही व्हायचे पण आत्मीयतेचा पाया पक्का होता. खानोलकर झोपडीत कधीच राहिले नाहीत. मुलाबाळांची वा कुटुंबियांची त्यांनी कधीच आबाळ होऊ दिली नाही. त्यांची आई, पत्नी आणि मुले सगळे एकत्र छान राहात. खानोलकरांचे आणि माझे एकमेकांच्या घरी जाणेयेणे होते. मी इथे दिलेली माहिती बरोबर आहे.

कृपया माझ्या नावावर काहीही खपवू नका -- कलेतल्या सर्जक प्रक्रिया नष्ट व्हाव्यात असे पुरोगाम्यांना वाटते, त्याबद्दल मी लिहितो -- कोण देशभक्त, कोण देशद्रोही, असले विषय माझ्या लेखनात नसतात -- तुमचा राग मी समजू शकतो, पण, नाही ते हार घालून सत्कार नको !

सगळे सविस्तर सांगून झालेले आहे, तरीही हेच मनात येत असेल तर तो माझा दोष नाही. धर्म, तत्त्वज्ञान आणि विचारसरण्या अपयशी ठरलेल्या आहेत. फक्त कलेतूनच काही भले होण्याची शक्यता आहे. कोणतीही वैचारिकता ही भेद माजवणारी आणि हिंसकच असते. कला व्यापक आणि समावेशक भान देणारी असते. ( यात परिवर्तनवादी कला येत नाही कारण ती विचारसरणीचाच भाग असते. ) राजकारणापेक्षा कला हजार पटींनी महत्त्वाची आहे. तीच नष्ट करण्याचे ज्यांचे प्रयत्न चालू आहेत त्यांच्यावर रोख असणारच ना ! आणि आहेत किती माझ्यासारखे लोक -- असू द्या ना ! पुरोगामी हे इकडेतिकडे पुरोगामी वगैरे असतात पण, साहित्य, कला यांत तद्दन प्रतिगामी असतात. आधुनिक सर्जकतेच्या प्रक्रिया, अभिव्यक्ति पद्धती यांत त्यांना शून्य इंटरेस्ट असते, त्यामुळे, समजतही नाही काही. आपल्याला ज्याचे महत्त्व वाटत नाही वा जे समजत नाही ते नष्ट करा असे त्यांचे विचार दिसतात. त्यांच्या दृष्टीने, ही राजकीय भूमिका की ती यांतून निवड करायची असते -- माझ्या आकलनात, राजकीय भूमिका की साहित्य-कला यांतून निवड करायची असते. सगळ्या राजकीय भूमिका माणसाच्या जगण्यातल्या सर्जकतेच्या विरोधातच असतात. या उपर माझ्या पोटात आरेसेस आहे असे कुणाला वाटले तर त्याची मी चिंता करू शकत नाही.मी माझ्या क्रॅरिटीने लिहितो -- कोणतीही राजकीय भूमिका मांडत नाही -- पण, पुरोगामी म्हटल्या जाणाऱ्या लोकांच्या , माझ्या मते इथल्या समाजाच्या दृष्टीने अति-महत्त्वाच्या अशा बाबतीतल्या, विध्वंसकतेबद्दल लिहिल्याने ते कुणाच्या हातचे कोलीत ठरत असेल तर त्याला मी काय करणार ? -- ते असो. तुम्ही वर उल्लेख केलेली ' फट ' कथा पीडीएफ असेल तर प्लीज द्या ना पाठवून.

इथे, बहुजन कसे काय पुरोगामी, असा प्रश्न येऊ शकतो. उत्तर सोपे आहे. " शाहू-फुले-आंबेडकरांचा हा पुरोगामी महाराष्ट्र " असे आपण रोजच ऐकतो की नाही ? म्हणजे हा पूर्ण महाराष्ट्र पुरोगामी आहे. इथले बहुजन हे पुरोगामी असल्याशिवाय पूर्ण महाराष्ट्र कसा काय पुरोगामी असू शकेल ? सारांश, बहुजन हे पुरोगामीच आहेत, हे सामान्यत: मान्यच असते !संख्येने बहुजन हा अर्थ आहेच ना -- राज्य म्हणजे काय -- इथली माणसेच ना -- माणसे वगळून कसले राज्य ?म्हणजे इथले बहुजन पुरोगामी नाहीत, तरीही, हे राज्य पुरोगामी आहे, असा हा मुद्दा दिसतोय -- हरकत नाही -- ये भी एक सोचनेकी बात है ! ' हा पुरोगामी महाराष्ट्र ' म्हणजे कुठला ? सह्याद्रीचे कडे तर पुरोगामी वगैरे नसतात !

धर्म, परंपरा आणि पुनरुज्जीवनवाद हे बरोबर आहे असे मी कधीच म्हणत नाही -- विचारसरणीची कोणतीही कट्टरता ही धार्मिक कट्टरतेसारखीच वाईट आणि हिंसक असते, हे मात्र म्हणतो. हा गंडलेला आणि तो न गंडलेला असे काही नाही. वैचारिक निराकरणेच नाहीत हिंसकपणावर -- ही मांडणी गंडलेली कशी ते स्पष्ट करा.जरा अधिक स्पष्ट करतो -- मला असे दिसते की मानवी समस्यांच्या बाबतीत धर्म, तत्त्वज्ञान आणि विचारसरण्या हे सर्व अपयशी ठरलेले आहेत . आता शक्यता फक्त कलेत आहे. कलेतूनच संवेदनशीलता आणि व्यापक, समावेशक भान हे शक्य आहे. परिवर्तनवादी कला नव्हे -- ती विचारसरणीतच येते. तर या कलेच्या सर्जक प्रक्रियांत अडथळे आणणारे, खोडे घालणारे, त्यांची हेटाळणी करणारे हे प्रामुख्याने पुरोगामी म्हटले जातात ते आहेत. त्यामुळे साहजिकच त्यांच्या मठ्ठपणाबाबत अधिक बोलले जाणारच. पुरोगामी हा विचारसरणीचाच भाग आहे. माझे बोलणे, लिहिणे हे माझ्या आकलन-प्रक्रियेतूनच येणार. त्याला कुणी गंडलेले म्हटले तरी हरकत नाही. यात वाद घालून कुणी कुणाला काही पटवून देण्याचा प्रश्न नाही. कुणी म्हणेल, वा, करेक्ट आहे, कुणी म्हणेल, हे सगळे मठ्ठ फालतू आहे ! दोनो चलेगा !

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात साहित्याबद्दल थोडेफार काही असावे, इतकीच एक माफक अपेक्षा !

माणूस मुळीच तत्त्वशील नाही हे जोरकसपणे सांगताना तसे लिहिले आहे -- ते कुणा एकाला उद्देशून नाही -- आपण सगळेच आपापले साचे बाळगून आहोत आणि काय कसे असायला हवे हे इतरांना सांगण्याचे अधिकारही घेत आहोत -- हा विशिष्ट प्रश्न कसा सुटायला हवा यावर ही पोस्ट नाही -- तुम्ही त्या एकत्वाची यांची वा त्यांची प्राज्ञा नाही म्हणाताय -- मी म्हणतोय की आपली कुणाचीच ती प्राज्ञा नाही -- त्यामुळे आपापले किरकोळ वैचारिक आदर्श आपल्याला फायनल वाटत राहतात -- साहित्य क्षेत्राला तडाबिडा काही गेलेला नाही -- तसा एकदम निकाल देऊ नये ही विनंती -- ' आम्ही गान्डू आहोत ' असे एका पिढीचे प्रतिनिधी म्हणाले तर तो उद्वेग असतो, हे वाचक समजून घेतात -- विचाराने प्रश्न सुटत नाहीत, चुकीचे निष्कर्ष निघतात -- मानवी संबंधांतल्या समस्यांत विचार निरुपयोगी असतो किंबहुना समस्या निर्माणच तो करतो, हे व्यक्त करणारी ही पोस्ट आहे -- विचार, कल्पना, मूल्ये आणि निष्कर्ष यांतच आपण घुटमळत राहतो -- हे जाणवण्यासाठीच बुद्धाचे अवतरण दिलेले आहे -- असो -- याउपर अर्थातच मतभेद या सदरात हे सर्व टाकून देऊ --
आपापले साचे टाकल्याशिवाय मधुर सूर अशक्य आहेत, हेच तर बुद्ध म्हणताहेत -- आणि आपण म्हणतच राहातोय की मधुर सुरांना अडथळे दुसरे लोक करतआहेत -- माझे साचे बरोबर आहेत ! आपले सगळ्यांचेच हेच चालू असल्यामुळे मतभेदांची पोती भरत राहतात आणि मग आपण सहिष्णुतेची गाणी म्हणायला लागतो --बुद्ध किंवा तुकाराम जेव्हा हे आपल्याला सांगतात तेव्हा ते प्रत्येकाला कळू शकेल असेच त्यांना म्हणायचे असते -- माणूस साचे सोडायला घाबरतो म्हणा किंवा त्याला त्यातच सुरक्षितता वाटत असावी -- आपल्याला आहे ते आहे तसेच रेटायचे आहे -- आपण बुद्ध आणि तुकाराम यांना या ना त्या कारणाने नकारच देणार असू तर जगाची वाट लागणे लांब नाही -- निदान तुम्ही, मी आणि आणखी काहींनी तरी बुद्धांचे समजून घेण्याचे प्रयत्न करत आणि तसे व्यक्त होत राहिले पाहिजे -- बुद्ध जगण्यात नाही येऊ शकत, असा प्रचार आपल्याकडून होऊ नये --सध्या मी एक पुस्तक वाचतो आहे -- ' questioning krishnamurti ' -- त्यात बुद्धाचे जगप्रसिद्ध अभ्यासक वालपोला राहुला यांची जेकें बरोबर एक चर्चा आहे -- प्रचंड उद्बोधक आहे -- ते पुस्तक मिळवून जरूर वाचा –

फुटीरता हे बुद्धीचेच काम -- माणसे, समूह, संस्था, जात, वर्ण, धर्म, देश -- सर्व प्रकारची –

धर्म म्हणजे समरूप होण्याचा साचा नव्हे –

पुस्तकांशी संबंधित काही असावे त्यात, म्हणजे झाले ! -- की ही माफक अपेक्षाही नसावी ? चार अध्यक्ष नुसतीच राजकारणावर भाषणे झोडून गेले होते -- तसे आता होणार नाही अशी आशा व्यक्त केलीय -- आणि माझी अपेक्षा व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य मला असू द्यावे ही नम्र विनंती आहे --साहित्याच्या. कलेच्या सांस्कृतिक प्रक्रियांपासून समाजाला वंचित ठेवणे हेच यांचे काम ! याचे कारण म्हणजे त्यांना त्यांचे महत्त्वच वाटत नाही आणि त्यामुळे त्यातले काही कळतही नाही !

चला, म्हणजे पुरोगामी असणे हे काही पुरोगाम्याचे कर्तृत्व नसते !पुरोगाम्याशी फार समरूप झाल्याने तसे तुम्हाला वाटत असावे -- खरे तर ही एकूणच जगण्यातलीच absurdity आहे -- आणि पुरोगामी अगदी सुसंगत व्यक्तिमत्वाचा असतो असे तुम्ही समजता की काय ?

अगदी सत्य आहे ! इतकी वर्षे मी अनेक प्रकारचे लेखन करतो आहे -- त्यावर पूर्ण दखल घेणारा एकही लेख नाहीय - - आयुष्यभरचे सर्व लेखन मोफत उपलब्ध करून देणारे माझे पहिले आणि एकमेव संकेतस्थळ आहे -- इथले विद्वान ई -साहित्यसंमेलन घेतात, त्यात कधीही या कामाचा साधा उल्लेखही झालेला नाही -- अर्थात हे समजूनच करायचे आपण काम -- पण, कधीतरी येतेच एक प्रतिक्रिया -- मराठीत लिहिणे म्हणजे वाळवंटात मुतणे आहे !

प्रकाश माझे एक नाटक करणार होता, त्याचे नाव त्याने, ' सांगून सुपरहिट ' असे ठरवले होते ! ते काही घडले नाही पण प्रकाशने माझ्या अनेक संहिता उत्तम प्रकारे सादर केल्या ! मला लेखक म्हणून सुरुवातीची मान्यता प्रकाश आणि विनायक पडवळ यांच्यामुळे मिळाली ! प्रकाशला खूप शुभेच्छा !

01 जाने 2021.